❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची


दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



राज्य सरकारचा बळीराजाला दिलासा

दुष्काळग्रस्तांना दिवाळीपूर्वी ५ हजारांची अग्रीम मदत; चारा हमीभावाने खरेदीसह फडणवीसांचे ४ मोठे निर्णय



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील दुष्काळाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन राज्य मंत्रिमंडळाने बळीराजाला मोठा दिलासा देणारे चार महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. पूर्वी जाहीर केलेल्या 265 तालुक्यांमध्ये आणखी 40 तालुक्यांची भर घालत आता राज्यातील तब्बल 305 तालुक्यांमध्ये अधिकृतपणे दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळी मदतीची कायदेशीर व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष निधी येण्यास डिसेंबर उजाडतो; परंतु यंदा बळीराजाची दिवाळी अंधारात जाऊ नये यासाठी दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 5 हजार रुपयांचा अग्रिम (आगाऊ) निधी थेट वर्ग करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. याशिवाय, मराठवाड्यातील भूजल पातळी खालावल्याने पिण्याच्या पाण्यासाठी 16 हजार अवैध उपसा जोडण्या तोडण्यात आल्या असून, दुष्काळात शेतकऱ्यांनी घेतलेला संपूर्ण चारा शासन हमीभावाने खरेदी करणार आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सहकारी उपस्थित होते. राज्यात काही भागात 90 दिवस तर काही भागात 6 ते 7 महिने पुरेल इतकाच चारा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी व चारा पिकांची लागवड करावी, असे आवाहन करत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला संपूर्ण चारा राज्य सरकार स्वतः हमीभावाने विकत घेईल, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्राला भरभरून लाभ दिल्याचे सांगत फडणवीस म्हणाले, मोदी सरकारच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात 12 लाख कोटींचे प्रकल्प साकारले आहेत. यात मुंबई मेट्रो, अटल सेतू, समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, वाढवण बंदर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा समावेश आहे.

शेतकऱ्यांसाठी ४ मोठे निर्णय

- **40 नव्या तालुक्यांचा समावेश; आता 305 तालुक्यांत दुष्काळ व 12 सवलती लागू**
सुरुवातीला राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या निवेदनांनंतर 'ट्रिगर 1' आणि 'ट्रिगर 2' या शास्त्रीय निकषांचा सखोल आढावा घेण्यात आला. फेरआढाव्यानंतर 40 तालुक्यांची नव्याने भर घालत एकूण 305 तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. या सर्व बाधित तालुक्यांसाठी ऑक्टोबर महिन्यातच पूरक शासन निर्णय काढून दुष्काळाच्या 12 महत्त्वपूर्ण सवलती लागू करण्यात आल्या आहेत.
- **दिवाळीपूर्वी खात्यात 5,000 रुपयांचा थेट अग्रिम**
केंद्र सरकार आणि राज्य प्रशासकीय स्तरावरील दुष्काळी मदतीचे निकष व टप्पे दिवाळीपूर्वी पूर्ण होणे अशक्य असते. मात्र, सणासुदीच्या दिवसांत बळीराजाला स्वतःचा संसार चालवता यावा, यासाठी एकूण अंतिम मदतीपैकी ५,००० रुपये अग्रिम रक्कम दिवाळीच्या आधी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा केली जाईल. कर्जमाफीचे काम समांतर सुरू: शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया थांबलेली नसून समांतर वेगाने सुरू आहे. नव्याने साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली असून त्यांच्या खात्यातही कर्जमाफीचे पैसे जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
- **पिण्याच्या पाण्यासाठी कठोर पावले**
मराठवाड्यातील बहुतांश भागांतील निरीक्षण विहिरींमध्ये पाण्याची पातळी 3 मीटरपेक्षा खोल गेली आहे. अशा भागात ऑक्टोबरपासूनच टँकर्स सुरू करण्यात आले आहेत. टँकर वाटपात गैरव्यवहार टाळण्यासाठी प्रत्येक टँकरवर जीपीएस (GPS) ट्रॅकिंग प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे. शेती व पिण्याच्या पाण्याच्या संरक्षणासाठी कठोर निर्णय घेत कालवे व धरणांमधून पाणी पळवणाऱ्या 16 हजार अवैध उपसा जोडण्या तात्काळ तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी बेकायदेशीर पाणी उपसा केल्यास थेट कारवाई केली जाईल.
- **विद्यार्थ्यांची फी माफी सरसकट लागू; चारा हमीभावाने शासन खरेदी करणार**
दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफ करण्यासाठी 1992चा जीआर अस्तित्वात होता; मात्र त्यात अनेक किचकट अटी असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत नव्हता. मंत्रिमंडळाने या सर्व जाचक अटी रद्द करून सरसकट परीक्षा व शैक्षणिक शुल्कमाफी लागू केली आहे.

थोडक्यात...



१६ ऑक्टोबरपासून दिल्लीत आंदोलन

नवी दिल्ली : दैनिक संध्या

'कॉकरोच जनता पार्टी'चे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके यांनी १६ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. बुधवारी जारी केलेल्या एका व्हिडिओ संदेशात, दिपके यांनी लोकांना १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता हातात तिरंगा घेऊन कनॉट प्लेस येथे जमण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "ते कदाचित मला तुरुंगातही टाकतील, पण मला त्याची पर्वा नाही." दिपके बुधवारी दुपारी दिल्लीत दाखल झाले. विमानतळावरून बाहेर पडत असतानाच लोकांच्या जमावाने त्यांच्यावर ओरडायला सुरुवात केली; एका प्रवाशाने त्यांना विचारले, "भावा, तू देश का खराब करत आहेस?" दिपके यांनी केवळ 'थम्स-अप'ची खूण केली आणि शांतपणे तिथून निघून गेले. दरम्यान, दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने CJP चे प्रवक्ते आशुतोष रांका आणि सौरव दास यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावत तिहार तुरुंगात पाठवले आहे. मंगळवारी सकाळी जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान त्यांना ताब्यात घेण्यात आले होते.

MPSC च्या सचिवपदी सौरभ कटियार यांची नियुक्ती; हरपाळकर यांची बदली

■ पुणे (दै. संध्या)

पेपरफुटी प्रकरणामुळे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, या पार्श्वभूमीवर आयोगात मोठे प्रशासकीय बदल करण्यात आले आहेत. आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तसेच, आयोगाचे विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार हे रजेवर गेल्याने, त्यांच्या अनुपस्थितीत अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगातील अन्य एका सदस्याकडे देण्याची प्रक्रिया सध्या प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. दरम्यान, या बहुचर्चित पेपरफुटी प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी राज्य सरकारने न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. या समितीला चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. राज्यपालांच्या मान्यतेनंतर या समितीची अधिकृत अधिसूचना निर्गमित होईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात होईल. चौकशी समितीचा अहवाल येण्यास आणि त्यावर सरकारचा अंतिम निर्णय होण्यास लागणारा कालावधी लक्षात घेऊनच आयोगाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दुसऱ्या सदस्याकडे सोपवण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. दरम्यान, सौरभ कटियार यांच्याकडे सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे



आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहीत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, MPSC आयोगाला नवीन सचिव (प्रभारी) लाभले. आता प्रतीक्षा नव्या अध्यक्षांची.. दोन महिन्यांनी नवीन अध्यक्ष नक्कीच लाभतील, तेही विद्यार्थ्यांच्या मनातले, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला आहे. MPSC पेपरफुटी प्रकरणामुळे पुण्यात विद्यार्थ्यांचे तीव्र आंदोलन सुरू होते. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी तूर्त रजेवर जाण्याचा निर्णय घेतल्याने या आंदोलनाची कोंडी फोडण्यात राज्य सरकारला यश आले आहे. आपण संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला नेहमी प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट करत, या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत आपण पदावर कार्यरत न राहता रजेवर जात असल्याचे भीमनवार यांनी जाहीर केले.

डॉ. बाबासाहेब यांचे स्मारक उभारणीसाठी प्रस्ताव द्यावा

■ मुंबई (दै. संध्या)

ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील जांभूळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित जमिनीवर त्यांचे स्मारक विकसित करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने महिला व बालविकास विभागाकडे जमीन मागणीचा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. हा प्रस्ताव सादर झाल्यानंतर महसूल विभागाशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. जांभूळ येथील संबंधित सुमारे ५० एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी ठाणे येथील डॉ. बी. आर. आंबेडकर प्रतिष्ठानने केली आहे. त्याअनुषंगाने विधानभवन येथे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे व विशेष सहाय्य विभाग सचिव हर्षदीप कांबळे, जलसंपदा विभागाचे सचिव प्र. बा. मिसाळ, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, ठाण्याचे सहायक आयुक्त समाधान इंगळे, कल्याण उपविभागाच्या उपविभागीय अधिकारी वृषाली पाटील, कल्याणचे तहसीलदार विकास गारुडकर, महसूल विभागाचे कक्ष अधिकारी डॉ. सुनील निमगावकर, म्हारळच्या मंडळ अधिकारी श्रीमती प्रीती घुडे, जांभूळ येथील शासकीय पुरुष भिक्षेकरीगृहचे प्रभारी अधीक्षक योगेश येंदे, डॉ. बी. आर. आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहूल हंडोरे, सचिव कुसुम गौतम यांच्यासह महिला व बालविकास तसेच सामाजिक न्याय विभाग आणि अन्य विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. सध्या ही जमीन महिला व बालविकास विभागाच्या ताब्यात असून, तिचा स्मारकासाठी उपयोग करण्याबाबत संबंधित



विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे निर्देश

विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी उपाध्यक्ष श्री बनसोडे यांनी दिले. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ मध्ये जांभूळ येथे जमीन खरेदी केली होती. निवडणूक लढविण्यासाठी जमीनधारणा आवश्यक असल्याच्या तत्कालीन तरतुदींच्या पार्श्वभूमीवर ही जमीन खरेदी करण्यात आली होती. पुढे ही जमीन विकण्यात आली. मात्र, १९३६ ते १९४२ या कालावधीत बाबासाहेबांचे या परिसराशी वास्तव्याच्या माध्यमातून नाते जोडले गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ठिकाणांचा विकास करण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली असल्याचा संदर्भ देत, जांभूळ येथील जमिनीवर बाबासाहेबांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी प्रतिष्ठानने यावेळी केली. या बैठकीत सामाजिक न्याय विभाग, महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग तसेच ठाणे जिल्हा प्रशासनाने परस्पर समन्वयातून पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. ते म्हणाले, जांभूळ येथील या जमिनीचा प्रश्न प्रशासकीय समन्वयातून मार्गी लागल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. त्याअनुषंगाने सामाजिक न्याय विभागाने प्रथम जमीन मागणीचा प्रस्ताव महिला व बालविकास विभागाकडे सादर करावा आणि त्यानंतर महसूल विभागाशी समन्वय साधून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी, असे उपाध्यक्ष श्री बनसोडे यांनी स्पष्ट केले.

महायुतीत कसलाही बहिष्कार चालणार नाही, तोडगा निघेल!

१० हजार शिक्षकांनी त्यांना लिहून दिलंय का? पदवीधर-शिक्षक निवडणुकीवर मंत्री जयकुमार गोरेंचा सवाल

■ सोलापूर (दै. संध्या)

"पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष तथा महायुतीचे अधिकृत उमेदवार रिंगणात उतरले असून प्रचाराची जोरदार तयारी सुरू आहे. महायुतीमधील कोणत्याही घटक पक्षाचा किंवा संघटनेचा या निवडणुकीवर कोणताही बहिष्कार राहणार नाही. '10 हजार 500 शिक्षकांचा मतदानावर बहिष्कार आहे', असा दावा केला जात असला तरी त्या शिक्षकांनी काय त्यांना तसे लिहून दिले आहे का? महायुतीत वरिष्ठ पातळीवर उत्तम समन्वय असून सर्व घटकांशी संवाद साधून लवकरच यावर मार्ग काढला जाईल," असा ठाम विश्वास मंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला आहे.

सोलापूर येथे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीनिमित्त भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जयकुमार गोरे यांनी निवडणुकीची रणनीती, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नाराजीचा दावा, उमेदवारांचे



आगामी दौरे आणि बहुप्रतीक्षित उजनी पर्यटन प्रकल्पाच्या कामाबाबत सविस्तर माहिती दिली. सोलापुरात पार पडलेल्या भाजपच्या बैठकीबाबत माहिती देताना मंत्री गोरे म्हणाले, "पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी भाजप तथा महायुतीची तयारी वेगाने सुरू आहे. आजच्या बैठकीत बूथ आणि मंडळ स्तरावर पक्ष कार्यकर्त्यांवर ठोस जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. मतदार याद्यांची पडताळणी, सुशिक्षित मतदारांपर्यंत पोहोचणे आणि पहिल्या टप्प्यातील प्रचाराचे अचूक नियोजन करणे यावर सखोल चर्चा झाली. महायुतीचे उमेदवार हे सक्षम आणि अनुभवी असून संपूर्ण पाच जिल्ह्यांमध्ये महायुतीची ताकद त्यांच्या पाठीशी उभी करण्यासाठी पक्षाची यंत्रणा आता पूर्ण क्षमतेने कामाला लागली आहे."

महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेच्या स्थानिक संघटनेने 10 हजार 500 शिक्षकांच्या मतदानावर बहिष्कार टाकल्याच्या दाव्यावर विचारले असता जयकुमार गोरे यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. "त्यांनी नेमका काय निर्णय घेतला आहे आणि तो कोणी जाहीर केला आहे, हे तपासावे लागेल. त्या १० हजार शिक्षकांनी काय यांच्याकडे तसे लिहून दिले आहे का? असा कुठलाही बहिष्कार प्रत्यक्ष मतदानात दिसणार नाही." "महायुतीमधील तिन्ही पक्ष आणि त्यांच्याशी संलग्न संघटना यांच्यात सतत संवाद सुरू आहे. महायुतीत कुठलाही मिठाचा खडा पडणार नाही. वरिष्ठ नेते यावर चर्चा करून तात्काळ तोडगा काढतील आणि सर्व घटक पक्ष पूर्ण ताकदीने प्रचारात सक्रिय राहतील." उमेदवार अद्याप सोलापूर दौऱ्यावर का आले नाहीत, या प्रश्नावर स्पष्टीकरण देताना त्यांनी मतदारसंघाच्या व्याप्तीची जाणीव करून दिली. "हा मतदारसंघ पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर अशा पाच मोठ्या जिल्ह्यांमध्ये पसरलेला आहे. त्यामुळे उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सर्व जिल्ह्यांचे नियोजनबद्ध दौरे आखण्यात आले आहेत.

राज्य सरकारचा मोठा निर्णय : अंगणवाडी सेविकांना २ हजारांची भाऊबीज

■ मुंबई (दै. संध्या)

यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे मोठे सावट असून राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. राज्य सरकारने 300 हून अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून शेतातील पिकांचे पंचनामेही पूर्ण करण्यात आले आहेत. बळीराजाला नेमकी मदत कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देत दिवाळीपूर्वीच 5 हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यासोबतच राज्य सरकारने राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासाठीही आनंदाची बातमी दिली आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना शासनाकडून दिवाळीपूर्वीच 'भाऊबीज भेट' म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. सद्यस्थितीत राज्यामध्ये 1 लाख 8 हजार 627 अंगणवाडी सेविका आणि 1 लाख 5 हजार 470 अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. या दोन्ही पदांची मिळून एकूण संख्या 2 लाख 14 हजार 97 इतकी आहे. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना प्रत्येकी



दोन हजार रुपयांची भाऊबीज भेट दिली जाणार असून, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने 42 कोटी 81 लाख 94 हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची अहोरात्र काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी अधिक आनंदात जावी आणि ती गोड व्हावी, हाच या निर्णयामागील शासनाचा मुख्य उद्देश असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

संपादकीय

जुनं ते सोनं

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे प्रभारी म्हणून नुकतीच गुजरात राज्यातील ज्येष्ठ भाजप नेते श्री पांडा यांची नियुक्ती झालेली आहे. नवनिर्वाचित प्रभारी यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र आणि मुंबई प्रांताचा भाजपचा मेळावा मोठ्या थाटात पार पडला. या मेळाव्यात महाराष्ट्राचे प्रभारी यांनी आपण कोणत्याही जिल्ह्याच्या दौ-यावर असो त्यावेळी त्या ठिकाणचे जुने जाणते पदाधिकारी. अनुभवी नेते. व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक व पदाधिकारी यांच्याशी मी संपर्क साधणार आहे. त्यावेळी त्यांची माझ्याबरोबर भेट होईल याबाबत स्थानिक कार्यकर्त्यांनी दक्षता घ्यावी. हा सल्ला त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना नेत्यांना मंत्र्यांना खासदार आमदारांना दिलेला आहे. त्याच वेळी पक्षाचे राष्ट्रीय संघटन मंत्री शिवप्रकाश यांनी भारतीय जनता पक्षाचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते हे महत्त्वाचे असून त्यांना जपण्याचे जाहीर आवाहन केलेले आहे."जुनं ते सोनं "या म्हणी प्रमाणे निष्ठावंत कार्यकर्त्यांना "चर्चेत "का होईना सुगीचे दिवस येतील असा आशावाद निर्माण झालेला आहे. भारतीय जनता पक्षामध्ये सन २०१४ पासून अनेक बाहेरच्या राजकीय पक्षातील पाहुणे देखील आलेले आहेत. व भाजपाने दाखल करून घेतलेले आहेत.त्यामध्ये अनेक जण काँग्रेस. राष्ट्रवादी काँग्रेस. शिवसेना मनसे व अन्य छोट्या मोठ्या पक्षाचे प्रस्थापित नेते मंडळीचा समावेश आहे. त्यामुळे असे झाले आहे की जिल्ह्या- जिल्ह्यातील व तालुका तालुक्यातील प्रस्थापितांच्या चांगल्या पायगुणाने त्या जिल्ह्यात व त्या तालुक्यात त्या गावात भाजप औषधाला दिसत नव्हता.तिथे स्थानिक स्वराज्य संस्थापासून साखर कारखाने. दूध संस्था. बँका व अन्य सहकारी संस्थामध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता आली. नजर फिरवू तिथे दूर- दूरवर भारतीय जनता पक्षाची सत्ता दिसू लागली. परंतु काँग्रेस राष्ट्रवादी सारख्या पक्षाच्या प्रस्थापिताविरुद्ध भाजपचे काही जुने जाणते नेते भारतीय जनसंघाची ही पणती मिणमिणती होती तेव्हापासून संघर्ष करत आहेत.अनेकांना त्यामुळे मोठी किंमत मोजावी लागली. आता तेच प्रस्थापित नेते भाजपवासी झाल्याने जुने जाणते नेते जिल्ह्यात तालुक्यात गावात व राजकारणात बाजूला पडलेले आहे दिसत आहेत. पक्षांचे नेते आल्यानंतर कार्यकर्त्यांच्या गर्दीत ते हरवून जात आहेत. व्यासपीठावरही पाहुण्यांचे हारतुरे घेऊन बाहेरच्या पक्षातून आलेली मंडळी सत्कार व स्वागत करत असल्याने जुन्या जाणत्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांना टाळ्या वाजवणे पलीकडचे काम उरलेले नव्हते. ही सल अनेक जुन्या जाणत्या निष्ठावंत मंडळीच्या मनात ठसठसतच आहे. ज्यांच्याशी संघर्ष केला त्या प्रस्थापित नेत्यांचा लोकसभा विधानसभा निवडणुकीत प्रचार करताना छातीवर दगड ठेवून प्रचार करावा लागत आहे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाचे तात्कालीन अध्यक्ष जे. पी.नड्डा यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीखेरीज भारतीय जनता पक्ष निवडणुकीत विजय प्राप्त करू शकतो असे विधान केले होते. ते संघाच्या जुन्या जाणत्या स्वयंसेवकाच्या व पदाधिकाऱ्यांच्या जिव्हारी लागले.त्यामुळे भाजपमधील जुने कार्यकर्ते सुद्धा दुखावले. पदे देताना उमेदवारी देताना निष्ठावंत भाजपच्या कार्यकर्त्यावर अन्याय केला जातो ही तर सर्वसामान्य कार्यकर्त्यात तक्रार होतीच पण आता तर आपल्या मदतीखेरीज सरकार आणणे शक्य आहे.या वक्तव्याने संघ भाजपचे कार्यकर्ते चांगलेच दुखावले.व त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला भरघोस यश प्राप्त झाले. त्यानंतर महायुतीची सत्तेची धुंदी खाडकन उतरली त्यानंतरच्या झालेल्या विधानसभा निवडणुकीत संघ स्वयंसेवक व जुने कार्यकर्ते यांची मदतीसाठी मनधरणी करून त्यांना विधानसभा निवडणूक प्रचारात उतरवले गेले व लाडकी बहीण सारख्या योजनांचे आमीष दाखवून महायुतीने व भाजपने विधानसभा निवडणुकीत बाजी मारली परंतु गेल्या काही दिवसापासून विरोधी पक्ष व सीजेपीच्या आंदोलनात जेन-झी उतरल्यामुळे सत्ताधारी भारतीय जनता पक्ष धास्तावलेला आहे. आगामी २०२९ च्या विधानसभा.लोकसभा निवडणुकीत विजय व सत्ता मिळवायची असेल तर जुने व नव्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना सर्वांना एकत्रित आणून पक्षांतर्गत मतभेद मिटवून लढावे लागेल याची जाणीव भारतीय जनता पक्षाच्या मुंबईपासून दिल्लीपर्यंतच्या पक्षश्रेष्ठींना झालेली आहे. कदाचित २०२९ च्या निवडणुकीत आपल्या वैचारिक भूमिकेच्या दीर्घकालीन यशासाठी अगोदर सरकार टिकवू हीच भूमिका किंवा मंत्र पक्ष नेतृत्वाकडून दिला जाईल. यानंतरचा दुसरा मंत्र प्रभारी पांडा व शिवप्रकाश यांनी दिला की पक्षाच्या सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी एकाच ठिकाणी बसू नये. सतत फिरत राहावे. केवळ पक्ष जणांना नव्हे तर सर्वसामान्य नागरीकाना भेटावे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यात सक्रियता आणण्याकरता हे बरोबर आहे जेव्हा एखाद्या पक्षाची दीर्घकाळ सत्ता असते तेव्हा कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यात समन्वय राहत नाही. आपले सरकार आहे व समोर विरोधक नाही या भावनेपोटी महाराष्ट्रात आपण सहज जिंकू असा आत्मविश्वास भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना दिसत आहे महाराष्ट्रात काँग्रेस -राष्ट्रवादीची सत्ता १५ वर्ष होती त्यांच्या कार्यकर्त्यांचाही २०१४ पूर्वी असाच समज होता की आपली सत्ता जाऊ शकत नाही. मात्र २०१४ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली आणि त्यांच्या पायाखालची सत्ता कधी निसटली हे त्यांना सुद्धा कळले नाही. सध्या भारतीय जनता पक्षामध्ये सुद्धा तेच चाललेले आहे भाजप-शिंदेसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी हेच सत्तेतील वाटेकरी असून निवडणुकीतील प्रतिस्पर्धी आहेत. त्यामुळे कार्यकर्ते. पदाधिकारी बेफिकीर होण्याचा धोका भाजपच्या पक्षश्रेष्ठींना दिसत आहे. त्यामुळे ही कानउघाडणी करणे भारतीय जनता पक्षाच्या श्रेष्ठींना करावी लालेली आहे.

डॉ. शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालयांचे अतुलनीय यश



■ शारदानगर (दै. संध्या)

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत १० आणि ११ ऑक्टोबर २०२६ रोजी,अहिल्यानगर येथील राजलक्ष्मी फाऊंडेशनच्या कृषि महाविद्यालय मदडगाव या ठिकाणी आंतरमहाविद्यालयीन वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धा २६-२७ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १० जिल्ह्यामधून ३० महाविद्यालयांनी भाग घेतला होता,ज्यात एकूण १३० स्पर्धकांचा सहभाग होता. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडी सौ.ज्योती गाडे आणि कृषि विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.विलास आवारी यांच्या हस्ते झाला.ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे डॉ.शरदचंद्र पवार कृषि महाविद्यालय आणि कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय शारदानगर बारामती या दोन्ही महाविद्यालयाच्या १६ विद्यार्थ्यांनी प्रा.पी.जी.पाटील आणि प्रा. आर.एम.बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत सहभाग घेतला होता.तसेच या दोघांनी व्यवस्थापक म्हणूनही काम पाहिले.या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाने द्वितीय क्रमांकाची (रनर-अप) जनरल चॅम्पियनशिप पटकावली.यामध्ये वक्तृत्व स्पर्धेत शिक्षण मंडळ वर्धा आणि एक्स चॅन्सलर पी.सी.अलेक्झांडर या विषयांमध्ये कृषि शाखेच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी जिग्नेश राजेंद्र पाटील यांनी इंग्लिश या भाषेतून या दोन्ही स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय क्रमांकाचे, तर हुंडा चळवळ मुंबई या विषयातून मराठी भाषेतून कु.साक्षी लोणकर हिने प्रथम क्रमांक पटकावला. या दोघांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

तसेच यामध्ये वादविवाद स्पर्धेसाठी निसर्ग आणि लोकसंख्या या विषयावरील इंग्लिश भाषेतून कृषिच्या ओम निलेश पाटे याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सहकारिता या विषयावरील इंग्लिश भाषेतून ए.बी.एम.महाविद्यालयच्या अमरीन शेख हिने तृतीय क्रमांक पटकावला. यामुळे महाविद्यालयाने एकूण १५ गुणांची कमाई करून द्वितीय क्रमांकाची जनरल चॅम्पियनशिप पटकावली. तसेच,स्पर्धेत सहभागी झालेले इतर सर्व विद्यार्थ्यांना मौल्यवान अनुभव मिळवला. या यशाबद्दल ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार,विश्वस्त सौ.सुनंदाताई पवार आणि संस्थेचे समन्वयक प्रा.ए.रासकर,कृषीचे प्राचार्य आणि उपप्राचार्य डॉ.ए.गोंडे आणि प्रा.एस.गायकवाड,ए.बी.एम च्या प्राचार्य ए. भोईटे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीचे अभिनंदन केले.

नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा उत्साहात संपन्न

■ शारदानगर (दै. संध्या)



ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे डॉ.शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालय, बारामती येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ (Induction Programme) –2026' चे आयोजन करण्यात आले.डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय आणि कृषी व्यवसाय महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरण,शैक्षणिक संधी,विविध उपक्रम,संस्थेच्या सुविधा तसेच भविष्यातील करिअरच्या संधींची माहिती मिळावी,या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना महाविद्यालय व शैक्षणिक जीवनासंदर्भात सामान्य मार्गदर्शन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी दि सीक्रेट (The Secret) या प्रेरणादायी चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार,ध्येय निश्चिती आणि आत्मविश्वासाचे महत्त्व समजावून देण्यात आले. दीक्षारंभ कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कृषी विज्ञान केंद्र (KVK), सेन्टर ऑफ एक्सलन्स डेअरी कॅम्पस, महाविद्यालय तसेच शारदा संकुल परिसराची भेट घडवून आणण्यात आली.या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना संस्थेतील विविध सुविधा, प्रात्यक्षिके आणि शैक्षणिक वातावरणाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली.दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती,आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या संधी आणि शिष्यवृत्ती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या विविध संधी तसेच उपलब्ध शैक्षणिक सहाय्य योजनांची माहिती मिळाली.तिसऱ्या दिवशी माजी विद्यार्थी मार्गदर्शन,क्रीडा व ट्रेकिंग,ए.डी.टी. माहितीपट, ब्रेन्स्टॉर्मिंग सेशन,ॲग्रिकल्चर कॉम्पिटिटिव्ह फोरम तसेच प्लेसमेंट गायडन्स अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या सत्रांमधून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास,स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळाले.दीक्षारंभाच्या चौथ्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी परिचयात्मक अभ्यासक्रम सत्र घेण्यात आली.त्यानंतर वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात आली. या संपूर्ण दीक्षारंभ कार्यक्रमामुळे नवोदित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची ओळख होण्यासोबतच शिक्षण,कौशल्यविकास,करिअर स्पर्धा परीक्षा,क्रीडा,उच्च शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध संधींची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक आणि आत्मविश्वासपूर्ण सुरुवात करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन मा.राजेंद्र पवार आणि विश्वस्त तथा सचिव मा.सुनंदाताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच यावेळी संस्थेचे समन्वयक, मानव संसाधन अधिकारी, सर्व प्राचार्य यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बदलत्या कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीशी नाळ जोडून राष्ट्र उभारणीत योगदान देण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प सर

■ बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बारामतीतील तरुणांनी हिमालयातील आव्हानात्मक माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प मोहीम दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण केली. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निमसाखर शाखा व्यवस्थापक अविनाश चव्हाण,बारामतीचे सुप्रसिद्ध डॉक्टर अनिल कारंडे (MD) आणि व्यावसायिक व नटराज नाट्य संस्थेचे सदस्य सचिन आगवणे सर यांनी जिद्द,चिकाटी आणि धाडसाच्या जोरावर हे यश संपादन केले.त्याबद्दल तिघांचेही मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचा सर्वांना सार्थ अभिमान आहे.


सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

■ काऱ्हाटी (बारामती) (दै. संध्या)

आदरणीय श्रीम. सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या 63 व्या वाढदिवसाचे औचित्य साधून कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था,काऱ्हाटी यांच्या वतीने शनिवार,दिनांक 17 ऑक्टोबर रोजी सकाळी 10.00 वाजता संस्थेच्या परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान हे मानवतेच्या सेवेसाठीचे महत्त्वपूर्ण कार्य असून,गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी रक्तदात्यांचे योगदान मोलाचे ठरते.सामाजिक बांधिलकी जपत मानवसेवेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे आणि रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण करणे,हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे,असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. वैद्यकीय निकषांनुसार रक्तदान करण्यास पात्र असलेल्या नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात योगदान द्यावे. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्याची ही संधी असून,नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा,असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. शनिवार,दिनांक 17 ऑक्टोबर रोजी सकाळी 10.00 वाजता कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी,ता.बारामती,जि.पुणे येथे आयोजित या रक्तदान शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदानाच्या या सामाजिक चळवळीला बळ द्यावे, असेही आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

लासुर्णे–सणसर गटात पाणीटंचाई निवारणासाठी मागणी नोंदवा!

■ लासुर्णे (दै. संध्या)



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई निवारण्यासाठी इंदापूर तालुक्यातील लासुर्णे–सणसर जिल्हा परिषद गटातील गावांमध्ये टंचाई आराखडा तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर गटातील सर्व गावांतील आणि वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांनी आपल्या पाणीविषयक समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन जिल्हा परिषद सदस्या माधुरी सागर भिसे यांनी केले आहे.

गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असल्यास तसेच नवीन बोअरवेल (विंधन विहीर) किंवा हातपंपाची आवश्यकता असल्यास नागरिकांनी तातडीने आपल्या गावचे ग्रामसेवक, सरपंच किंवा जिल्हा परिषद सदस्य यांच्याशी संपर्क साधून मागणी नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाणीटंचाई निवारणासाठी तयार करण्यात येणाऱ्या टंचाई आराखड्यात गावांच्या गरजांचा समावेश होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्व गरजू गावांनी आणि वाड्या-वस्त्यांनी वेळेत आपली मागणी नोंदवावी. टंचाई आराखडा अंतिम झाल्यानंतर नवीन बोअरवेल किंवा हातपंपाच्या कामांचा समावेश करणे शक्य होणार नाही, अशी विशेष सूचना देण्यात आली आहे.

गावागावांतील पाणीटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहून प्रशासनाशी समन्वय साधावा आणि आपल्या गावातील पाणीसमस्यांची माहिती संबंधित लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत प्रशासनाला द्यावी. वेळेत मागणी नोंदविल्यास पाणीटंचाई निवारणाच्या उपाययोजनांसाठी आवश्यक कार्यवाही करण्यास मदत होईल. "आपला प्रश्न, आपली मागणी — वेळेत नोंदवा!" या संदेशातून माधुरी सागर भिसे यांनी लासुर्णे–सणसर जिल्हा परिषद गटातील नागरिकांना पाणीटंचाईच्या प्रश्नावर पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.

बुलेटस्वारांविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिसांची कारवाई



■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बुलेट मोटारसायकलींना मॉडिफाइड सायलेन्सर बसवून फटाक्यांसारखा मोठा आवाज करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिसांनी कारवाई केली आहे. मॉडिफाइड सायलेन्सरमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनीप्रदूषण होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या प्रकारांना आळा घालण्यासाठी वडगाव निंबाळकर पोलिसांनी विशेष कारवाई करत तीन बुलेट मोटारसायकली पकडून संबंधित वाहनचालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली.या कारवाईत एकूण १८,००० रुपये दंड आकारण्यात आला. तसेच संबंधित बुलेट मोटारसायकलींचे मॉडिफाइड सायलेन्सर काढून टाकण्यात आले. सदर कारवाई API मोहिते व PSI मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईमध्ये पोलीस हवालदार खेडकर,पोलीस हवालदार खांडेकर,पोलीस अंमलदार पन्हाळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल यादव,जाधव,धोत्रे,येताळे व पवार यांनी सहभाग घेतला. वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसवू नयेत.ध्वनीप्रदूषण करून नागरिकांना त्रास होईल असे कृत्य करू नये. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड

खो-खो स्पर्धेत जिजामाता विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाचा प्रथम क्रमांक

■ जेजुरी (दै. संध्या)



जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय, पुणे यांच्या वतीने आयोजित शासकीय तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या संघाची जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विजयामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशामध्ये संघातील सर्व खेळाडूंचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक सोमनाथ उबाळे , अमोल राणे, श्वेतांबर बेलसरे, राजाराम पिसाळ यांनी विशेष मेहनत घेतली. खेळाडूंचा नियमित सराव, जिद्द, चिकाटी, सांघिक भावना आणि प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांमुळे संघाला हे यश संपादन करता आले. आता जिल्हास्तरीय स्पर्धेतही संघाने उत्कृष्ट कामगिरी करावी, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव, मा.आमदार संजयजी जगताप,सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे, रविंद्रपंत जगताप यांनी संघाचे अभिनंदन केले. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर ,आबासाहेब काळाणे,गुरुकुल अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य संदिप टिळेकर, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप , माध्यमिक विभाग प्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक यांनीही खेळाडू व प्रशिक्षकांचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा कौशल्यांच्या विकासासाठी विद्यालयाकडून सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत जिजामाता विद्यालयाचा संघ विजयाची परंपरा कायम राखेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये 'साई दरबार'चा भक्तिमय जागर

पुणे : दैनिक संध्या

श्री साई भक्त बबलु दुग्गल प्रस्तुत 'साई दरबार' हा साईबाबांच्या जीवनावर आधारित गीत गायन व चमत्कारांचा कार्यक्रम पुण्यातील लोकमान्य नगर येथे आयोजित लोकमान्य फेस्टिवलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला साईभक्तांसह रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात साईबाबांच्या भक्तीवरील विविध सुरेल गीतांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच साईबाबांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आणि चमत्कारांचे सादरीकरण करून उपस्थितांना साईभक्तीचा अनुभव देण्यात आला. भक्तिगीतांच्या सुरांनी आणि साईबाबांच्या जीवनातील प्रसंगांनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. साईबाबांच्या शिकवणीतील श्रद्धा, सबुरी, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आला. साईबाबांच्या भक्तीचा प्रसार आणि त्यांच्या विचारांचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम उपस्थित रसिकांसाठी भक्तिमय पर्वणी ठरला. अशी माहिती लोकमान्य फेस्टिवलचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली.



इंडिया स्किल्स स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणीची मुदत १९ ऑक्टोबरपर्यंत वाढविली


पुणे : दैनिक संध्या

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने आयोजित इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ साठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत १९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. देशातील कुशल युवकांना राष्ट्रीय स्तरावर कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी या स्पर्धेतून मिळणार असून, उत्कृष्ट उमेदवारांना पुढे WorldSkills सारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकते. जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. काही विशिष्ट कौशल्य क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ रोजी किंवा त्यानंतर, तर इतर ५० कौशल्य क्षेत्रांसाठी १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर झालेला असणे आवश्यक आहे. शासकीय व खासगी आयटीआय, सुक्ष्म, लघु व मध्यम, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये, कौशल्य प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे तसेच इतर शैक्षणिक संस्थांमधील पात्र उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी १९ ऑक्टोबर २०२६ पूर्वी Skill India Digital पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी. अधिकाधिक पात्र युवकांनी या संधीचा लाभ घेऊन स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सु. रा. वराडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१, रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा.

३१ ऑक्टोबरपर्यंत कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचे नियोजन

पुणे : दैनिक संध्या

विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (व्ही.बी.-जी. रामजी) अंतर्गत ग्रामीण भागात जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती करून मनुष्यदिनांची संख्या वाढविण्यासाठी पुणे जिल्ह्यात कृषी विभाग , ल. पा. वि. जिल्हा परिषद, पंचायत विभाग जिल्हा परिषद, वनविभाग, सामाजिक वनीकरण आणि रेशीम विभागाचे कामांचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. यामध्ये जलसंधारण चे कामावर भर देणे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या कामांचे नियोजन करून ती कामे शेल्फवर समाविष्ट करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत ग्रामसभा घेणे आणि ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन शेल्फवर ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपजिल्हाधिकारी चारूशिला देशमुख-मोहिते यांनी मिशनअंतर्गत कामांच्या नियोजनाचा आणि उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेतला. ग्रामीण भागात रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामे निश्चित करावीत, तसेच निर्धारित कालमर्यादेत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. आज रोजी ग्रामपंचायत विभागाचे १७ हजार ४३८, कृषी विभागाचे २ हजार ११, वन विभागाचे १, सामाजिक वनीकरण विभागाचे ८, तर रेशीम विभागाचे २० कामे शेल्फ वर आहे. कामांचे नियोजन करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत ग्रामसभांचे आयोजन करून स्थानिक पातळीवर कामांची निश्चिती करण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ ऑक्टोबरपर्यंत संबंधित कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन ती कामे शेल्फवर समाविष्ट करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे मंजूर नियोजनानुसार कामे वेळेत सुरू करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी करता येणार असून, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढविण्यास मदत होणार आहे. मनरेगाअंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व संबंधित यंत्रणांना नव्या व्ही.बी.-जी. रामजी मिशनच्या अनुषंगाने उद्दिष्टांचे वाटप करण्यात आले आहे. प्रत्येक यंत्रणेने आपापल्या उद्दिष्टानुसार कामांचे नियोजन, ग्रामसभांमधील निश्चिती आणि प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. बैठकीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांच्यासह ल. पा. वि. जिल्हा परिषद, पंचायत विभाग जिल्हा परिषद, कृषी, वन, सामाजिक वनीकरण आणि रेशीम विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.



डॉ. अब्दुल कलाम यांच्यातील माणूसपण अनुभवण्याचे भाग्य लाभले

■ पुणे : (दै. संध्या)



"खांद्यावर हात ठेवून आपुलकीने संवाद साधणारे, प्रत्येक गोष्टीत पितृतुल्य भावनेतून मार्गदर्शन करणारे आणि सर्वांमध्ये मिळून-मिसळून काम करणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यातील माणूसपण आम्हाला नेहमीच जाणवले. कधी कधी आयुष्यात देव भेटेल की नाही, हे माहीत नाही; पण डॉ. अब्दुल कलाम यांचा सहवास लाभला, यातच मोक्षप्राप्ती झाल्याची भावना मनात निर्माण होते," अशा शब्दांत निवृत्त शिक्षक जनार्दन इंगळे यांनी डॉ. कलाम यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त लेखक, संदर्भतज्ज्ञ व ग्रंथप्रसारक प्रसाद भडसावळे लिखित 'प्रेरणेची पाऊलवाट: डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम' या पुस्तकातील प्रेरणादायी गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत डॉ. कलाम यांचे विचार, अनुभव आणि जीवनमूल्ये पोहोचविण्याच्या उद्देशाने आबासाहेब अत्रे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचनकक्षात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. कलाम यांचा भाभा अणुसंशोधन केंद्रात तीन वर्षे सहवास लाभलेले निवृत्त शिक्षक जनार्दन इंगळे यांच्या हस्ते कनिष्ठ महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांना पुस्तकाच्या प्रती भेट देण्यात आल्या. उपस्थित विविध क्षेत्रांतील मान्यवरही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पोखरण येथील अणुचाचणीनंतर किरणोत्साराचे मानवी शरीरावर होणारे परिणाम तपासण्यासाठी स्वतः चाचणीमध्ये सहभागी झाल्याचा जनार्दन इंगळे यांचा अनुभव विशेष उल्लेखनीय आहे. अनेक वर्षे त्यांनी हा अनुभव इतरांना सांगितला नव्हता. मात्र, प्रसाद भडसावळे यांनी इंगळे यांचा अनुभव आणि डॉ. कलाम यांच्याशी असलेल्या त्यांच्या परिचयाची पार्श्वभूमी यांवर आधारित 'जनार्दन जी, कैसे हो?' ही गोष्ट बोधकथेच्या स्वरूपात पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. या माध्यमातून आपला अनुभव अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचत असल्याबद्दल इंगळे यांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी लेखक, संदर्भतज्ज्ञ व ग्रंथप्रसारक प्रसाद भडसावळे यांनी प्रास्ताविक केले. पुस्तकनिर्मितीमागील भूमिका विशद करताना, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या जीवनातील प्रसंग आणि अनुभव पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी शाळेच्या माजी विद्यार्थिनी मुग्धा आठवले यांनी पुस्तकातील 'जनार्दन जी, कैसे हो?'या गोष्टीचे वाचन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या आणि मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी आबासाहेब अत्रे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवीण सुपे, डॉ. भक्ती वारे, परिवर्तन संस्थेचे राहुल मोकाशी, किशोर ढगे, सामाजिक कार्यकर्ते मनोज लेले, गणेश जोशी, मुग्धा आठवले, प्रवीण महाजन, पत्रकार श्रीराम ओक, सागर गावडे, श्याम दराडे, उत्तम साळवे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद भडसावळे यांनी केले, तर आभार प्राचार्य प्रवीण सुपे यांनी मानले.

महाराष्ट्राबाहेरील खासगी वाहनांच्या तपासणीसाठी परिवहन विभागाची विशेष मोहीम

■ पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्याबाहेर नोंदणीकृत असून महाराष्ट्रात नियमितपणे वापरल्या जाणाऱ्या खासगी वाहनांची तपासणी करण्यासाठी परिवहन विभागामार्फत १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे वाहनांची नोंदणी, करभरणा आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी सुरु आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ४७ अन्वये, एका राज्यात नोंदणीकृत वाहन दुसऱ्या राज्यात एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी वापरले जात असल्यास संबंधित राज्यात वाहनाची पुनर्नोंदणी करून विहित मोटार वाहन कर भरणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतुदींनुसार आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे शहर व परिसरात महाराष्ट्राबाहेरील नोंदणी क्रमांक असलेल्या आणि नियमितपणे वापरल्या जाणाऱ्या खासगी वाहनांची विशेष तपासणी करण्यात आली असून ५ ते १२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत केलेल्या कारवाईनुसार, १३४ वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. ३७ वाहनांवर दोष आढळले आहेत. तीन वाहने अटकावून ठेवण्यात आली असून २१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

पुणे शहरातील नागरिक व वाहनधारकांनी आपल्या वाहनांची नोंदणी, कर आणि इतर संबंधित कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत. तसेच, परिवहन विभागाच्या तपासणीस आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल बालकाचा वाचवला जीव

■ पुणे (दै. संध्या)

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणे येथील कंसल्टण्ट पेडियाट्रिक्स आणि पीआयसीयू इन-चार्ज डॉ. पार्थ दलाल यांच्या नेतृत्वाखालील पेडियाट्रिक क्रिटिकल केअर टीमने फिजिओथेरपी विभागासह अत्यंत गंभीर स्थितीत असलेल्या पाच वर्षांच्या मुलाच्या उपचारात आणि त्याला बरे करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. हा मुलगा ऑक्सिजनची धोकादायक पातळीवर घसरलेली पातळी, वारंवार येणारे झटके आणि रक्ताभिसरणातील बिघाड अशा नाजूक स्थितीत हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. या मुलाला श्वास घेताना त्रास होत होता, जिथे त्याच्या ऑक्सिजनची पातळी ७५ टक्क्यांपर्यंत घसरली होती. त्याची प्रकृती चिंताजनक होती आणि त्याला स्थिर करण्यासाठी डॉक्टरांना तातडीने पावले उचलावी लागली. हा मुलगा आधीच मेंदू आणि मज्जासंस्थेवर परिणाम करणारा एक दुर्मिळ आजार क्रॅबे डीसीज आणि क्वाड्रिप्लेजिक सेरेब्रल पाल्सीने पीडित होता, ज्यामुळे चारही अवयवांच्या हालचालींवर गंभीर मर्यादा येतात. खोकल्यानंतर झालेल्या उलट्यांच्या एका प्रकारानंतर अन्न किंवा पोटातील घटक त्याच्या फुफ्फुसात गेले असावेत, ज्यामुळे त्याला श्वास घेण्यास गंभीर त्रास झाला आणि त्याला ॲस्पिरेशन न्यूमोनिया असण्याचा संशय व्यक्त करण्यात आला. डॉक्टरांनी श्वासोच्छवासाला साहाय्य करण्यासाठी त्याला तातडीने व्हेंटिलेटरवर ठेवले आणि चोवीस तास देखरेखीसाठी बालरोग अतिदक्षता विभागात (पीआयसीयू) हलवले.



ध्यान सत्र तसेच मानसिक आरोग्य जनजागृती

■ पुणे (दै. संध्या)



योग व प्राणायामाबद्दल जागरूकता निर्माण करणे, शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, तणावमुक्त जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने सेवा दवाखाना, कुरकुंभ येथे योग व ध्यान सत्र तसेच मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. योग करा, मन शांत ठेवा आणि शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी राहा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांनी योगाचे महत्त्व, नियमित योगाभ्यासाचे फायदे, प्राणायाम, शारीरिक आरोग्याचे संवर्धन तसेच निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले. योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता वाढण्यास, तणाव कमी करण्यास आणि सर्वांगीण आरोग्य सुधारण्यास मदत होते. मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन, चिंता कमी करण्यासाठी योग व प्राणायामाची भूमिका, मनःशांती, सकारात्मक विचारसरणी आणि भावनिक संतुलन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मानसिक आरोग्याची काळजी घेणे, पुरेशी झोप घेणे आणि दैनंदिन जीवनात योग व ध्यानाचा समावेश करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

राज्यात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविणार

■ पुणे (दै. संध्या)

पुणे : राज्यातील काही भागांमध्ये पर्जन्यमानातील तूट आणि खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम लक्षात घेता, आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत चारा जतन, पीक अवशेषांचा योग्य वापर, चाऱ्यावर प्रक्रिया, मुरघास निर्मिती आणि पर्यायी चारा उत्पादन याबाबत पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी यासंदर्भात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांना मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. संभाव्य टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी, उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून चाऱ्याची उपलब्धता वाढविणे आणि त्याची नासाडी रोखणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर आणि हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा व धाटे यांसारख्या पीक अवशेषांचे योग्य संकलन आणि सुरक्षित साठवणूक करण्यावर अभियानात भर देण्यात येणार आहे. हे अवशेष जाळणे किंवा त्यांची नासाडी होणे टाळून, त्यांचे पोषणमूल्य वाढविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया करण्याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले जाईल. पावसापासून संरक्षण, योग्य आर्द्रता, बुरशी प्रतिबंध आणि कोरड्या जागेत साठवणूक या बाबींची प्रात्यक्षिकेही आयोजित करण्यात येणार आहेत.

निकृष्ट व वाळलेल्या चाऱ्याची उपयुक्तता वाढविण्यासाठी शिफारशीनुसार प्रक्रिया पद्धतींची माहिती देण्यात येईल. कडबा व पेंढ्यावर युरिया प्रक्रिया करण्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण, तसेच चाऱ्याची नासाडी कमी करण्यासाठी कडबाकुट्टी यंत्राच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

हिरवा चारा उपलब्ध असलेल्या भागांमध्ये मुरघास निर्मितीची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये हायड्रोपोनिक युनिट विकसित करून कमी खर्चात हिरवा चारा तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येईल. तसेच पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अझोला बेड तयार करून त्याचा पशुआहारातील वापर आणि उपयुक्तता याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना कमी कालावधीत आणि कमी पाण्यात वाढणाऱ्या चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. धरणे व तलावांतील पाणी ओसरल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या गाळपेरा क्षेत्रात चारा पेरणी करण्याबाबतही नियोजन करण्यात येणार आहे. अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी आणि पशुधन पर्यवेक्षक यांच्या सहभागातून गावागावांत पशुपालकांच्या बैठका, मेळावे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

सक्षम माता, सशक्त किशोरी; रक्तक्षयमुक्त पुण्यासाठी जिल्हा परिषदेचा पुढाकार

■ पुणे (दै. संध्या)



गर्भवती माता आणि किशोरवयीन मुलींचे आरोग्य सुदृढ राखून रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा परिषद पुणेच्या आरोग्य विभागामार्फत 'सेवा संकल्प अभियानांतर्गत – सक्षम माता, सशक्त किशोरी, रक्तक्षयमुक्त पुणे' हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून हिमोग्लोबिन तपासणी, पोषणविषयक जनजागृती, वेळेवर निदान आणि योग्य उपचार यावर भर देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत गर्भवती माता आणि किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करून रक्तक्षयाचे लवकर निदान करण्याचे उद्दिष्ट आहे. रक्तक्षय आढळलेल्या लाभार्थ्यांना वैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार, लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळ्यांचे नियमित सेवन आणि आवश्यक पुनर्तपासणीबाबत मार्गदर्शन केले जात आहे. रक्तक्षय टाळण्यासाठी संतुलित आणि सकस आहाराचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. आहारात हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये, नाचणी, शेंगदाणे यांसारख्या लोहयुक्त पदार्थांचा समावेश करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच आवळा, लिंबू आणि पेरू यांसारख्या 'क' जीवनसत्त्वयुक्त पदार्थांमुळे शरीरातील लोहाचे शोषण सुधारण्यास मदत होते, याबाबतही जनजागृती केली जात आहे. जेवणासोबत चहा किंवा कॉफी घेणे टाळावे, तसेच रक्तक्षय आढळल्यास केवळ आहारावर अवलंबून न राहता डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घ्यावेत, असे मार्गदर्शन लाभार्थ्यांना केले जात आहे. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी आणि शैक्षणिक संस्थांच्या समन्वयातून या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. माता आणि किशोरवयीन मुलींच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे, रक्तक्षयाचे दुष्परिणाम रोखणे आणि नियमित तपासणीची सवय निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी गर्भवती माता आणि किशोरवयीन मुलींचे आरोग्य सुदृढ ठेवणे ही निरोगी समाजाच्या निर्मितीची गुरुकिल्ली असल्याचे नमूद केले. तर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी वेळेवर निदान, पोषक आहार आणि योग्य उपचार या त्रिसूत्रीच्या माध्यमातून रक्तक्षयाचे दुष्परिणाम टाळण्यास मदत होत असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील माता आणि किशोरवयीन मुलींचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच रक्तक्षयमुक्त पुण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



स्वर सिंधू नामफलकाचा दिमाखात शुभारंभ चंद्रकांत हिवरकर यांची गाणी गाजली

चाकण : दैनिक संध्या

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून एकत्रित आलेल्या तरुण व परिसरातील गायक व डॉक्टरांनी स्थापन केलेल्या सिंधू मेडिकल फाउंडेशन व स्वर सिंधू म्युझिकल ग्रुपच्या माध्यमातून स्वर सिंधू नामफलकाचा मोठ्या दिमाखात शुभारंभ करण्यात आला. डॉ. अमोल बेनके, डॉ. पल्लवी बेनके व स्वर सिंधू ग्रुपचे चंद्रकांत हिवरकर आदींच्या हस्ते या नाम फलकाचे अनावरण करण्यात आले. डॉ. अमोल बेनके व डॉ. पल्लवी बेनके यांनी सांगितले की," संगीत हे असे औषध आहे की ज्याला गोळ्यांची, प्रिस्क्रिप्शनची गरज नसते. ज्याचा प्रत्येक स्वर मनाला नवी ऊर्जा देऊ शकतो. त्याचा आनंद घेतला पाहिजे." खेड पंचायत समितीच्या माजी सभापती विद्या मोहिते, जिल्हा परिषदेचे सदस्य विजय शिंदे, बाजार समितीचे संचालक महेंद्र गोरे, पुणे जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप पोकळे, उद्योजक सतीश बारवकर, सतीश हिवरकर, डॉ. आकाश तैरैया आदींच्या हस्ते अनावरण व दीप प्रज्वलन करण्यात आले. चंद्रकांत हिवरकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले होते. संजय फल्ले, नयन शिंदे, उत्तम जाधव, सुशील उपाध्ये, अरुण देवरे, अजय राऊत, गणेश शेटे, वनिता तुपे, रूपाली अभंग, प्रीती गायकवाड, हर्षा वैद्य, संजय फल्ले आदींनी मराठी गीते सादर केली. ऋषभ हिवरकर व शैलेश घावटे यांनी स्वागत केले. "खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व व्यापारी महेंद्र गोरे यांची कन्या स्व. वैष्णवी महेंद्र गोरे हिच्या स्मरणार्थ गायकांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. डॉ. कौस्तुभ तिडके, गौरी बेनके, विद्या मोहिते, महेंद्र गोरे, अरुण बनसोडे, भरत भुजबळ, दीपक कुंभार, सुधीर रामगीर, डॉ.आयेशा सिद्दिकी आदींच्या हस्ते डॉक्टर व गायकांना गौरविण्यात आले."

विजयनगर काळेवाडी मधील पाणीपुरवठा आठ दिवसात सुरळीत करा : संतोष कोकणे



पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ विजयनगर काळेवाडी मधील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, नागरिकांना अनियमित आणि कमी दाबाने पाणी मिळत आहे. या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत करण्याची मागणी नगरसेवक संतोष अंकुश कोकणे यांनी केली आहे. यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक २२ विजयनगर काळेवाडी मधील विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करून नागरिकांना नियमित वेळेत आणि पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. मात्र, पाणीपुरवठा अनियमित होत असल्याने पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरासाठी पाणी मिळवताना नागरिकांची गैरसोय होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. "प्रभाग क्रमांक २२ विजयनगर काळेवाडी मधील काळेवाडी व परिसरात कमी दाबाने आणि अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज असून, नागरिकांना त्यांच्या हक्काचे पाणी नियमितपणे मिळालेच पाहिजे. या समस्येमुळे विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची गैरसोय होत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करावा. अन्यथा, नागरिकांच्या हक्कासाठी महापालिका भवनावर हंडा मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येईल.

रविवारी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

चाकण : दैनिक संध्या

महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासह वाढत्या वयात हाडांचे आरोग्य जपण्याचे महत्त्व नागरिकांना समजावे, या उद्देशाने चाकण येथे रविवारी (दि.१८) मोफत आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ चाकण, रोटरी क्लब ऑफ चाकण एअरपोर्ट आणि श्रद्धा हॉस्पिटल, चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या निरोगी आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी रविवारी हे शिबिर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत श्रेया लॉन्स, चाकण - तळेगाव रोड, नाणेकरवाडी येथे होणार आहे. या शिबिरात हाडांची घनता तपासणी, बीएमडी, रक्त तपासणी तसेच रजोनिवृत्ती, मेनोपॉज, हार्मोनल बदल, हाडांचे आरोग्य, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वाढत्या वयानुसार हाडांची होणारी झीज, महिलांच्या शरीरात रजोनिवृत्तीच्या काळात होणारे बदल आणि आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

E-Tender Notice

E-Tenders are being invited from reputed contractors registered with MSEDCL by the office of Chief Engineer Pune Zone, MSEDCL, Pune, with details as below,

Tender No. **T-03/26-27:** work of Supply, Installation & Commissioning of Remotely Operated Connect-Disconnect Switch (RCDS) on Pilot Basis for 11kV Feeders under Rajgurunagar Division, Pune Zone, Tender Cost Rs. 25 Lakhs.

For details, please visit our website http://works.mahadiscom.in/eTender, Contact person: Shri. S. A. Sarode, Executive Engineer (Admn.), Phone Nos.: 020-26065740; Mb No 7875767003, email: cepuneurban@gmail.com, cepuneurban@mahadiscom.in

(No. PRO/PZ/149/2026-27) **Chief Engineer (PZ)**



संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराच्या स्वच्छतेची धुरा

■ पिंपरी (दै. संध्या)

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसराची नियमित स्वच्छता होणे आवश्यक असते. ही स्वच्छता प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सफाई सेवकांचे नियोजन, कामावर देखरेख आणि विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील महिला आरोग्य निरीक्षक, आरोग्य मुकादम या सांभाळत आहेत. स्नेहल सोनवणे, संतोषी कदम, स्नेहा चांदणे, स्नेहल सुकटे, कोमल फर्डे, रश्मी तुंडलवार, रूपाली साळवे, महिला आरोग्य मुकादम प्रमिला शिंदे, शिवगंगा नागरगोजे, रुक्मिणी बिनवडे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

शहरातील विविध भागांतील स्वच्छता कामांचे नियोजन करणे, सफाई कर्मचाऱ्यांशी समन्वय साधणे आणि कामकाजावर लक्ष ठेवणे, अशा जबाबदाऱ्या त्या पार पाडतात. स्वच्छतेविषयक उपक्रम प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी त्यांना सातत्याने प्रयत्न करावे लागतात. दैनंदिन कामकाजातून शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यास त्यांचे योगदान मिळत आहे.

स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने शहरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे याला महत्त्व आहे. या कामात महिला आरोग्य निरीक्षक, आरोग्य मुकादम, सफाई सेवकांच्या मदतीने विविध स्वच्छता उपक्रम राबवतात. नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन होण्यासाठी प्रयत्न करणे, यावरही भर दिला जातो. स्वच्छतेसोबतच पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारीही महत्त्वाची आहे.

'माझी वसुंधरा' अभियानाच्या उद्दिष्टांशी सुसंगत पर्यावरणपूरक सवयींना प्रोत्साहन देणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे, या प्रयत्नांत आरोग्य विभागाची भूमिका महत्त्वाची ठरते.

'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'मुळे मराठा उद्योजकांना प्रोत्साहन

आमदार महेश लांडगे यांनी नवोदित उद्योजकांना केले आवाहन

■ पिंपरी-चिंचवड : (दै. संध्या)

उद्योजकांना व्यवसायविस्ताराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्थेच्या वतीने 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये (पीआयईसीसी) १५ ते १८ ऑक्टोबरदरम्यान हे प्रदर्शन होणार आहे. या आयोजनाच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गुरूवार दि.१५ ऑक्टोबर रोजी प्रदर्शनाला सुरूवात होईल. दि. १६, १७ आणि १८ ऑक्टोबर असे ४ दिवस मोशी येथे प्रदर्शन होणार आहे. प्रदर्शनासाठी एक हजारांहून अधिक स्टॉल्स आणि सात लाखांहून अधिक अभ्यागतांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे आकडे अपेक्षित सहभागाचे असून, विविध उद्योगांतील उद्योजक, नवउद्योजक आणि व्यावसायिकांना एकत्र आणण्याचा आयोजनाचा उद्देश आहे. व्यवसायांना बाजारपेठेशी जोडणे, उद्योजकांमध्ये



सहकार्य वाढविणे आणि नव्या संधींची ओळख करून देणे यावर भर दिला जाणार आहे. उत्पादन क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम व स्थावर मालमत्ता, वित्तीय सेवा, आरोग्य, कृषी, शिक्षण, वाहतूक, खाद्य व आदरातिथ्य यांसह विविध क्षेत्रांचा समावेश प्रदर्शनाच्या नियोजनात आहे. महिला उद्योजकता आणि स्टार्टअप्सनाही व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. उत्पादने आणि सेवांचे सादरीकरण करण्यासोबतच संभाव्य ग्राहक, वितरक आणि गुंतवणूकदारांशी संपर्क साधण्याची संधी उद्योजकांना मिळावी, अशी आयोजनाची संकल्पना आहे.

लहान व्यवसायांना अनुभवी उद्योजकांशी जोडणे, व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि स्थानिक उद्योगांना व्यापक बाजारपेठेची दृष्टी देणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. अधिक उद्योजक घडविणे, व्यवसाय सक्षम करणे आणि त्यातून रोजगाराच्या संधी वाढविणे यासाठी सामूहिक व्यासपीठ उभारण्यावर संस्थेचा भर आहे.

महिला उद्योजकांना व्यवसायाची ओळख वाढविण्यासाठी आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांशी संवाद साधण्यासाठीही प्रदर्शनात संधी उपलब्ध करून देण्याचे आयोजकांचे नियोजन आहे. व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक संपर्क, बाजारपेठेची माहिती आणि सहकार्याच्या शक्यता एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील उद्देश आहे. "आपल्या तरुणांनी नोकरीच्या संधी शोधण्यासोबतच उद्योग उभारून रोजगार देणारे बनावे. त्यासाठी त्यांच्या कल्पनांना मार्गदर्शन, उत्पादनांना बाजारपेठ आणि मेहनतीला संधी मिळणे आवश्यक आहे.

कृषिपंपांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रत्येक जिल्ह्यात 'मिशन मोड'वर

■ पुणे : (दै. संध्या)

दुष्काळी परिस्थितीत राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात १ हजार नवीन वितरण रोहित्र व 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' तसेच 'कॅपॅसिटर बँक' खरेदीसाठी जिल्हानिहाय २० कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. १२) सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला आणि ही सर्व कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे आदेश दिले.

मुंबई येथील 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित बैठकीमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रत्येक जिल्ह्यातील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके बुधवार (दि. १४) पर्यंत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले. या निधीमधून होणाऱ्या वीजयंत्रणेच्या सक्षमीकरणाच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही तसेच नादुरुस्त किंवा बंद पडलेले रोहित्र तातडीने बदलण्यात यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह कार्यकारी संचालक तसेच सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने कृषिपंपांना आणि कृषी वीजवाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आवश्यकतेनुसार विद्यमान ६३ केव्हीएऐवजी १०० केव्हीए क्षमतेचे तसेच अतिरिक्त सिंगल पोल रोहित्र उभारण्यात येणार आहे. यासोबतच कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी 'स्पेशल डिझाईन रोहित्रे' (एसडीटी) बसविण्यात येणार आहेत. तर योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांमध्ये आणि वीजवाहिन्यांवर आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँक्स बसविण्यात येणार आहेत. विशेष निधीमधील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी दि. १४ ऑक्टोबरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावेत.

लेखनव्रती स्व.प्रा.वर्धमान अभयकुमार संगई यांचे प्रथम पुण्यस्मरण

स्व.प्रा.वर्धमान अभयकुमार संगई यांचा जन्म अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे दिनांक 16 फेब्रुवारी 1937 रोजी झाला व दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. आज त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण हीच भावपूर्ण आदरांजली. स्व.प्रा.वर्धमान संगई सरांनी प्राथमिक व माध्यमिक सीताबाई संगई हायस्कूल, अंजनगाव सुर्जी येथून शिक्षण घेऊन एम.ए. मराठी, एम.ए. इतिहास, हिंदी विशारद, संस्कृत विशारद, बीएड, ड्रॉईंग इंटरमिजिएट हे पदव्युत्तर शिक्षण घेतले. जैन धर्माचे शिक्षण त्यांनी परमश्रद्धेय ब्र. माणिकचंद चवरे (तात्या) कारंजा लाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. त्यांचे प्रेरणास्त्रोत परमपूज्य 108 श्री समन्तभद्र महाराज, बाहुबली हे राहिले.

स्व.प्रा.वर्धमान संगई सरांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे मराठी व इतिहास विषयाचे प्राध्यापक म्हणून 27 वर्षे सेवा केली. इतिहास विभागप्रमुख म्हणून ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्व.प्रा.संगई सरांनी आयुष्यभर शिक्षणासाठी प्रचार प्रसार केला व त्यांच्या लेखणीतून परिवर्तनाची, विवेकाची, विज्ञाननिष्ठ शिकवण त्यांनी समाजाला दिली.

महाराष्ट्रभर त्यांनी विविध विषयावरती व्याख्याने दिली. त्यांच्या व्याख्यानातून शिक्षण, जैन तत्वज्ञान, शाकाहार, नैतिक मूल्य इत्यादीवर त्यांनी अभ्यासपूर्ण व्याख्याने देऊन समाज प्रबोधन केले. सरांनी केलेले काम, त्यांची तत्त्वनिष्ठा, कामावरचे प्रेम, नैतिकता या आणि अशा अनेक बाबीतून विद्यार्थ्यांनाच नव्हे तर समाजाला त्यांनी आदर्श घालून दिला. साने गुरुजी, विनोबा भावे, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस यांचा प्रभाव त्यांच्यावरती होता. थोर महापुरुषांच्या विचारांचे ते प्रचारक होते.

तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान अशी प्रा.संगई सरांची लोकप्रतिष्ठा होती. त्यांच्या विद्या व्यासंगासह समाजाभिमुखतेचे यथार्थ दर्शन त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्वातून प्रत्ययाला येत होते. त्यांची ज्ञानसंपदा आणि लेखन प्रपंच केवळ प्रसिद्धीसाठी नसून समाजासाठी होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. उदात्त व सात्विक विचार त्यांनी आपल्या सर्वच लेखातून व व्याख्यानातून मांडले. त्यांच्या लेखनातून एक तत्ववेत्ता ज्ञानोपासक व समाजसेवक शिक्षक उमगला. खरंतर ते एक आदर्श ज्ञानपीठच होते. त्यांचे लेखन म्हणजे एक शब्दयज्ञच आहे. ते रोज नियमितपणे डायरी लिहीत होते. त्यात नवीन वाचन, लेखन विविध अनुभव, समाजातील व्यक्तीचे अनेक संदर्भ, घटना, प्रसंग इत्यादीची टिपणे त्यांनी केली होती. त्यांचे वाचन चौफेर होते. त्यांच्या डायरीतील लेखकांच्या नोंदी बघितल्या तर अफाट वाचनाची कल्पना आल्याशिवाय राहत नाही.बर्नार्ड शॉची 'मॅन अँड सुपरमॅन' हे प्रसिद्ध नाटक, रसेलचे वैचारिक लेखन, शेक्सपियरची प्रसिद्ध नाटके, 'हॅम्लेट', टॉल्स्टॉय ची 'वॉर अँड पीस' ही कादंबरी त्यावरील टिपणे मॅक्झिम गॉर्कीचे लेखन कादंबरीची टिपणे, उमरखैयाम, खलील जिब्रान, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, रुसो, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांचे माझे सत्याचे प्रयोग, पंडित नेहरू, कार्ल मार्क्स, लेनिन, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास स्वामी यांच्या वाङ्मयाचे वाचन व टिपणे त्यांनी काढून विविध लेखांमधून समाजापुढे ठेवले.

प्रा.संगई सर म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते. एक कुशल प्राध्यापक बुद्धिवंत, विचारवंत, विद्वान लेखक, संवेदनशील कवी, कथाकथनकार, प्रभावी वक्ता, चित्रकार, संगीताची जाण असलेला रसिक श्रोता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक कुटुंब वत्सल शांत आणि समंजस स्वभावाचे होते.

आपल्या प्रत्येक कार्यात प्रामाणिकपणे सहयोग देणारे निराभिमानी, निरहंकारी, प्रसिद्धी परान्मुख होते. त्यांची प्रासादिक भाषा, निर्लोभीपणा हे सर्व गुण त्यांना त्यांच्या पिताश्रींकडून वारसा हक्काने मिळाले होते.प्रा.संगई सरांनी पाचशेच्या वर लेख जैनबोधक, सन्मती, श्राविका, तीर्थंकर इत्यादी मासिकातून तसेच सकाळ, केसरी महाराष्ट्र टाइम्स, पुढारी, लोकमत इत्यादी वर्तमानपत्रातूनही प्रसिद्ध झाले होते. शाकाहार व व्यसनमुक्ती वरील त्यांची व्याख्याने 200 पेक्षा अधिक झाली होती. शाळा, महाविद्यालये, जेष्ठ नागरिक संघ, इत्यादी मधून अनेक व्याख्याने त्यांनी दिली. बारामती, बारामती परिसरातील शाळा, महाविद्यालये येथे व्याख्याने दिली. त्याचबरोबर औरंगाबाद, जालना, जिंतूर, देऊळगाव राजा, पंढरपूर, नांदेड, उस्मानाबाद, कुंथलगिरी, नेमगिरी, मुक्तागिरी, अचलपूर, परतवाडा, अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार, अमरावती, भातकुली, कर्नाटकात गुलबर्गा येथे विविध विषयावर त्यांनी व्याख्याने दिली.


शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. शिक्षणातून नवचैतन्य नवीन संस्कृती व नवा समाज निर्माण झाला पाहिजे यासाठी त्यांनी सतत त्यांच्या शिकवणुकीतून, लेखणीतून विचार व्यक्त केले. वाचन हे विचारांचे विद्यापीठ आहे. वाचनासाठी विचारशक्ती आवश्यक आहे. शिक्षण पद्धतीत जाणीवपूर्वक बदल करून विचारशक्ती जागृत व्हावी हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे असे ते म्हणत. आनंदी राहणे, आनंदी जगणे हा सरांचा छंद होता. शेवटी आपले जगणे हे आपल्याच हातात असते आनंदी जगणे ही एक सुंदर कला आहे व ती सतत जोपासायला हवी असे सरांचे आग्रही मत होते. ते नेहमी म्हणायचे विद्यार्थ्यांनी माझ्यावर केलेले भरभरून प्रेम हीच माझी खरी संपत्ती आणि वैभव आहे. त्यांनी त्यांच्या शिकवणुकीतून त्यांच्या मुलाबाळांना, सुनांना, नातवांना उच्च शिक्षण दिले व चांगले संस्कार केले आहेत.शिक्षणाबरोबरच जैन संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा प्रसार करणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय त्यांनी ठरविल्यामुळे जैन कथाकथन करणे, जैन तत्वज्ञानावर व्याख्याने देणे, प्रवचन करणे आणि अहिंसा, अनेकान्त, अपरिग्रह, शाकाहार इत्यादी विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. विविध मासिकातून वर्तमानपत्रातून प्रबोधनाची चर्चा करीत असत. जैन तत्वज्ञानाचा प्रसार आंतरराष्ट्रीय स्तरावर व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील राहिले. सतत नाविन्याचा शोध घेण्याची वृत्ती त्यामुळे नव्या आव्हानांना सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्यामध्ये होती. जीवनातला प्रत्येक क्षण काहीतरी सृजनात्मक कार्य करायचे हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. सर पद, पैसा, प्रतिष्ठा यापासून सदैव दूर राहिले.

सरांनी अगदी शेवटच्या श्वासापर्यंत त्यांचे लेखन, विचार व मार्गदर्शन सोडले नाही.

विद्यार्थी शिक्षण परायण असावा,
शिक्षक विद्यार्थी परायण असावा,
दोघेही ज्ञान परायण असावेत आणि
ज्ञान सेवा परायण असावे'

विनोबाजींच्या या उक्ती सरांच्या रक्तारक्तात भिनला होत्या. असे विद्यार्थीप्रेमी व्यक्तिमत्व, अभ्यासू, संवेदनशील आणि कर्तृत्ववान नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. परंतू त्यांनी घडविलेले अनेक विद्यार्थी त्यांनी दिलेले विचार, त्यांचे लेखनातून ते आजही आपल्याला भेटतात. शिक्षणाचा घेतलेला वसा सरांनी शेवटपर्यंत जपला. साने गुरुजींच्या उक्ती कायम त्यांच्या ओठी असायच्या 'करेल मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे'. त्याप्रमाणे मुलांचे मनोरंजन करीत करीत सर अनंतात विलीन झाले.

थोडक्यात पण महत्वाचे





शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणाची महिला आयोगाकडून गंभीर दखल

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणाची महिला आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज (दि.१३) कलाटे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच या प्रकरणातील आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप हे देखील उपस्थित होते. यावेळी हुंडाबळीच्या वाढत्या घटनांबद्दल रहाटकर यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. समाजात हुंडाबळी विरोधात जनजागृती होत असतानाही अशा घटना घडत असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथांमुळे महिलांचे आयुष्य धोक्यात येत असेल, तर समाज नेमका कोणत्या दिशेने जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शिल्पा गवारे प्रकरणातील आरोपींना अद्याप जामीन मंजूर झालेला नसल्याची माहिती देत, या प्रकरणात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे रहाटकर यांनी स्पष्ट केले. तसेच या प्रकरणाचा तपास पुढे नेऊन लवकरच दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहितीही त्यांनी दिली.

अवध राजपूत संघाच्या सामाजिक कार्यासाठी हक्काची जागा द्या

पिंपरी : दैनिक संध्या

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणांसाठी राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांना गती देण्यासाठी योग्य सार्वजनिक जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अवध राजपूत विकास संघाने केली आहे. संघाचे अध्यक्ष उमाशंकर सिंह यांनी यासंदर्भात भाजपाचे आमदार महेश लांडगे यांना निवेदन दिले असून, संबंधित प्रशासनामार्फत जागेची पाहणी करून आवश्यक मंजुरीची कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. अवध राजपूत विकास संघाच्या माध्यमातून परिसरातील समाजघटकांच्या हितासाठी सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातात. मात्र, या उपक्रमांचे नियमित आणि प्रभावी आयोजन करण्यासाठी हक्काची जागा नसल्याने अडचणी येत आहेत. रचनात्मक आणि सामाजिक कामांसाठी योग्य सार्वजनिक जागा उपलब्ध नसल्यामुळे संस्थेच्या कार्यावर मर्यादा येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांना एकत्र येण्यासाठी, महिलांच्या सहभागातून सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आणि तरुणांना विधायक कार्याशी जोडण्यासाठी योग्य जागेची आवश्यकता आहे. अशी जागा उपलब्ध झाल्यास संस्थेच्या उपक्रमांमध्ये सातत्य राखणे आणि अधिक नागरिकांपर्यंत पोहोचणे शक्य होईल, अशी भूमिका संघाने मांडली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना योग्य जागेची पाहणी करण्याचे निर्देश द्यावेत. जागा निश्चित करून ती सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करण्याबाबत आवश्यक मंजुरीची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आमदार महेश लांडगे जनहिताच्या, सामाजिक आणि विकासात्मक कामांना प्राधान्य देतात, असा उल्लेख संघाने निवेदनात केला आहे. सामाजिक उपक्रमांसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीवरही सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात संघाचे अध्यक्ष उमाशंकर सिंह, उपाध्यक्ष राजेंद्र सिंह, कोषाध्यक्ष ओमशंकर सिंह आणि संस्थापक सदस्य राजेश सिंह यांची नावे नमूद आहेत. सामाजिक कार्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून संस्थेच्या विधायक उपक्रमांना बळ द्यावे, असे आवाहन अवध राजपूत विकास संघाने केले आहे. "ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणांसाठी विधायक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना बळ देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अवध राजपूत विकास संघाच्या जागेसंदर्भातील मागणीचा सकारात्मक विचार करून संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करू. योग्य जागेची उपलब्धता आणि आवश्यक प्रशासकीय बाबी तपासून, नियमानुसार प्रस्तावाला गती मिळावी यासाठी पाठपुरावा करू. सामाजिक कार्याला हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी माझे सहकार्य राहील."

मराठा समाजातील कर्तृत्ववान 'नवदुर्गां'चा होणार भव्य सन्मान

पिंपरी : दैनिक संध्या

समाजाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या आणि आपल्या कार्यातून इतरांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या मराठा समाजातील कर्तृत्ववान महिलांचा भव्य सन्मान करण्यात येणार आहे. अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने 'मराठा नवदुर्गा महिला सन्मान २०२६' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सन्मानासाठी पात्र महिलांची नामांकने १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पाठविण्याचे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणे, त्यांच्या संघर्षमय प्रवासाला समाजासमोर आणणे आणि त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. समाजासाठी निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या महिलांना सन्मानाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. आरोग्य व वैद्यकीय सेवा, शिक्षण, समाजसेवा, महिला सक्षमीकरण, उद्योजकता, रोजगारनिर्मिती, क्रीडा, साहित्य, कला, संस्कृती, पर्यावरण संवर्धन, आपत्कालीन मदत आणि वंचितांच्या पुनर्वसनासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा या सन्मानासाठी विचार केला जाणार आहे.

जपान दूतावास सहकार्याने पीसीसीओई मध्ये 'नो जपान २०२६' कार्यक्रमाचे आयोजन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे जपानच्या मुंबईतील वाणिज्य दूतावास सहकार्याने 'नो जपान २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध कक्ष आणि जपान सुविधा केंद्राद्वारे होणाऱ्या या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन शुक्रवारी, (दि. १६ ऑक्टोबर) सकाळी १०:३० वाजता होईल. सर्वांसाठी मोफत असून पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे. जपान एक्सटर्नल ट्रेड ऑर्गनायझेशन चे प्रतिनिधी, उद्योग तज्ञ मार्गदर्शन करतील. ते जपान मधील उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, इंटर्नशिप, प्लेसमेंट, करिअरचे मार्ग, तांत्रिक प्रगती, उद्योगाच्या अपेक्षा आणि जपानी कार्यपद्धती याबद्दल माहिती देतील. जपान मधील उद्योग, शिक्षण, संस्कृती, शैक्षणिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक संधीं बद्दल माहिती दिली जाईल. हा उपक्रम पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून देण्यासाठी आणि जागतिक शैक्षणिक, संशोधन व करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या चालू असलेल्या प्रयत्नांना पूरक आहे. भारतातील विद्यार्थी आणि जपानमधील शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यात अधिक सामंजस्य आणि सहभाग वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून विकसित झाले आहे असे उपक्रम विद्यार्थ्यांना व्यापक जागतिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करतात.

रावेतमध्ये २७ मेगावॅटचा नवा प्रकल्प उभारण्याच्या हालचाली

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मोशी कचरा डेपोत सुक्या कचऱ्यापासून 14 मेगा वॅट क्षमतेचा वीजनिर्मितीचा (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्प आहे. मात्र, जून महिन्यापासून तो बंद आहे. महापालिकेच्या वतीने दुसरा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प रावेत येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. एमआयडीसीची 25 एकर जागा लवकरच त्या प्रकल्पासाठी महापालिकेच्या ताब्यात येणार आहे.

मोशी डेपोत वेस्ट टू एनर्जी प्रकल्प डीबीओटी तत्त्वावर जुलै 2023 पासून सुरू करण्यात आला आहे. धुराड्याची चिमणी 5 जून 2026 ला पडल्याने त्या दिवसापासून प्रकल्प बंद आहे. त्यानंतर 8 जुलैला ठेकेदार कंपनीची अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर,12 कर्मचारी जखमी झाले. त्या दिवसापासून डेपोत कचरा वाहतूक वाहनांना प्रवेश दिला जात नसल्याने संपूर्ण शहरात कचराकोंडी निर्माण झाली आहे. प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे निर्देश देऊनही प्रकल्प मुदतीमध्ये सुरू झालेला नाही. त्यामुळे ठेकेदारला 1 ऑक्टोबरपासून प्रत्येक दिवसाला 50 हजार रुपये दंड आकाराला जात आहे. मोशी दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने 1 हजार टन कचऱ्यापासून 27 मेगा वॅट क्षमतेचा दुसऱ्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरू करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले होते. मात्र, मोशी डेपोत जागा उपलब्ध नसल्याने तेथे प्रकल्प राबवणे गैरसोयीचे ठरत असल्याचे प्रशासनाचे मत आहे. त्यामुळे रावेत येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी एमआयडीसीच्या रावेत येथील सेक्टर क्रमांक 23 मधील सर्व्हे क्रमांक 155, 156, 158 व 177 जलशुद्धीकरण केंद्रातील उर्वरित 25 एकर जागेची मागणी आयुक्तांनी नगर विकास विभागाकडे आठ सप्टेंबर 2026 ला केली आहे. त्यासंदर्भात कार्यवाही सुरू असून, एमआयडीसीकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. सर्व प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यानंतर लवकरच ती जागा महापालिकेच्या ताब्यात येईल. त्यानंतर निविदाप्रक्रिया राबवून तेथे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वेस्ट टू एनर्जी प्रकल्प राबण्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू केली जाईल. परिणामी, मोशी डेपोवरील कचऱ्याचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. रावेत येथे वेस्ट टू एनर्जी प्रकल्प झाल्यास दररोज तब्बल एक हजार सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लागणार आहे. तो कचरा जाळून महापालिकेस स्वस्त दरात वीज उपलब्ध होणार आहे. तसेच, रावेत परिसरातील जमा झालेला कचरा मोशीपर्यंत नेण्याचा वाहतुकीचा मोठा खर्चातही बचत होणार आहे.

एका दिवसात २६ हजार किलो धान्यदान.. 'एक मुठ्ठी अनाज' अभियानाचा नवा विक्रम

■ पिंपरी (दै. संध्या)



मूठभर धान्याच्या दानातून गरजूंना अन्नाचा आधार देणाऱ्या 'एक मुठ्ठी अनाज' अभियानाने यंदा उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सर्वपित्री अमावस्येनिमित्त १० ऑक्टोबर रोजी आयोजित विशेष उपक्रमात एकाच दिवसात तब्बल २६ हजार किलो धान्याचे संकलन करण्यात आले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ९५ गृहनिर्माण सोसायट्यांमधील नागरिकांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा लाभ रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथील पाच सामाजिक संस्थांमधील ३४६ लाभार्थ्यांना होणार आहे.

पितृपक्षात पूर्वजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अन्नदान करण्याच्या परंपरेला सामाजिक बांधिलकीची जोड देत हे अभियान राबविण्यात येते. नागरिकांनी दिलेल्या धान्याचे संकलन करून ते गरजूंपर्यंत पोहोचविले जाते. यंदाच्या विशेष उपक्रमातून दापोलीतील पाच संस्थांमधील विद्यार्थी, निराधार ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि विशेष गरजा असलेल्या मुलींच्या अन्नपुरवठ्यासाठी मदतीचा आधार उभा राहिला आहे. अभियानाचे संस्थापक-अध्यक्ष विनोद पाटील यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "एक मुठ्ठी अनाज हे केवळ धान्यसंकलनाचे अभियान नाही, तर समाजातील प्रत्येक कुटुंबाला माणुसकीच्या धाग्याने जोडणारे पवित्र कार्य आहे. समाजाने दाखविलेल्या विश्वासामुळे गेल्या २ हजार दिवसांपासून दररोज ८५० निराधार आणि गरजू बालकांच्या भोजनाची व्यवस्था अखंडपणे सुरू ठेवता आली आहे."

या सेवाकार्यात योगदान देणाऱ्या सोसायट्यांमधील रहिवासी, दानशूर कुटुंबे आणि अथक परिश्रम घेणाऱ्या स्वयंसेवकांचे त्यांनी आभार मानले.अभियानाच्या कार्याची माहिती मिळाल्यानंतर पद्मश्री दादासाहेब इदाते यांनी धान्य संकलनाच्या ठिकाणी भेट देऊन कार्यकर्त्यांचे कौतुक केले. या वेळी त्यांनी ३६ हजारांहून अधिक कुटुंबांना एकत्र आणून वंचित घटकांपर्यंत अन्न पोहोचविण्याच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

'त्या' घटनेनंतर रुग्णवाहिकेचा चालक आणि वॉर्डबॉय निलंबित

■ पिंपरी (दै. संध्या)



वायसीएम रुग्णालयातून ससून रुग्णालयात उपचारासाठी नेताना वृद्ध रुग्ण धावत्या रुग्णवाहिकेतून खाली पडल्याप्रकरणी संबंधित वाहनचालक आणि वॉर्डबॉय यांना निलंबित करण्यात आले आहे. वाहनचालक अजितकुमार भगत आणि वॉर्डबॉय गजानन ठोंबरे असे निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव आहे.

वृद्ध रुग्णाला पुढील उपचारांसाठी ससूनला नेण्यात येत होते.

रुग्णवाहिकेचा दरवाजा व्यवस्थित बंद नसल्यामुळे तो खाली पडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. रुग्ण पडल्याचे लक्षात आल्यानंतर पुढे गेलेली रुग्णवाहिका पुन्हा घटनास्थळी आली. चालकाने वृद्धाला पुन्हा रुग्णवाहिकेत घेतले आणि तेथून निघून गेल्याचेही प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. या घटनेप्रकरणी महापालिकेने संबंधित वाहनचालक आणि वॉर्डबॉय यांना सुरुवातीला नोटीस बजावली होती. आता दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान या दोघांवर कारवाई झाली असली, तरी रुग्णवाहिका रवाना करण्यापूर्वी सुरक्षा तपासणी झाली होती का, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. दरवाजा आणि स्ट्रेचरच्या लॉकमध्ये तांत्रिक दोष होता की कर्मचाऱ्यांनी खबरदारी घेतली नाही, याचीही तपासणी करण्यात येत असल्याचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी सांगितले.

२ कोटी ७७ लाखांच्या डिजिटल रेडिओग्राफी मशीनच्या किमतीवर प्रश्नचिन्ह

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १००० एमए (1000 MA) डिजिटल रेडिओग्राफी सिस्टिम खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेल्या २ कोटी ७७ लाख ५६ हजार रुपयांच्या अंदाजित किमतीबाबत सविस्तर पडताळणी करण्याची मागणी नगरसेवक संदीप बाळकृष्ण वाघेरे यांनी केली आहे. या खरेदीचा दर योग्य आहे का, याची अधिकृत कागदपत्रांच्या आधारे तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिकेच्या ई-निविदा क्रमांक GEM/2026/B/7797530 अंतर्गत या वैद्यकीय उपकरणाची अंदाजित किंमत २ कोटी ७७ लाख ५६ हजार रुपये नमूद करण्यात आली आहे. या किमतीसाठी कोणते बाजारभाव, दरपत्रके, पूर्वीचे शासकीय खरेदी व्यवहार आणि आर्थिक निकष विचारात घेण्यात आले, याची माहिती घेऊन संबंधित उपकरणाचे सविस्तर Price Analysis आणि Rate Analysis करण्यात यावे, अशी मागणी वाघेरे यांनी केली आहे.

संदीप वाघेरे यांनी निवेदनात नमूद केलेल्या माहितीनुसार, दिल्ली येथे डिसेंबर २०२१ मध्ये संबंधित मशीन सुमारे १ कोटी १२ लाख रुपयांना पाच वर्षांच्या वॉरंटीसह पुरविण्यात आले होते. तसेच, २०२५ मध्ये राजस्थानमधील कोटा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित मशीन सुमारे १ कोटी ४० लाख रुपयांना पुरविण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील काही संस्थांच्या खरेदी दरांचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. त्यानुसार, जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे सुमारे २ कोटी ४९ लाख ५२ हजार ३७५ रुपये, जनरल हॉस्पिटल, वाशी येथे २ कोटी ७७ लाख ५६ हजार रुपये, तर जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे सुमारे ३ कोटी ७९ लाख रुपये इतकी खरेदी किंमत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करू; आमदार महेश लांडगे यांचे आश्वासन

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक विचार करून पुढील योग्य कार्यवाही करू, असे आश्वासन आमदार महेश लांडगे यांनी दिले. प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने दिव्यांगांच्या आर्थिक सहाय्य, घरपट्टी सवलत, स्वयंरोजगार आणि सार्वजनिक सुविधांशी संबंधित मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. यावेळी संघटनेच्या प्रतिनिधींनी दिव्यांगांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

आमदार महेशदादा लांडगे स्पोर्ट्स फाउंडेशन व शिवांजली सखी मंच यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रोत्सव उत्साहात सुरू आहे. देवीच्या दर्शनासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक भेट देत असून, यानिमित्ताने नागरिक आपल्या समस्या व मागण्यांची निवेदने प्रत्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्याकडे सादर करत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या प्रतिनिधींनी शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले.

दिव्यांग व्यक्तींना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनात समान संधी मिळण्यासाठी महापालिकेच्या स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली आहे. प्रलंबित प्रश्नांबाबत महापालिका आयुक्तांना आवश्यक निर्देश देऊन तातडीने सकारात्मक कार्यवाही व्हावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्वतःच्या मालकीच्या घरात राहणाऱ्या पात्र दिव्यांग व्यक्तींना घरदुरुस्ती आणि आवश्यक सुधारणा करण्यासाठी एकरकमी दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी आहे. घरपट्टीतील ५० टक्के सवलतीसाठी इंडेक्स-२ उपलब्ध नसलेल्या दिव्यांगांना पर्यायी मालकी कागदपत्रांच्या आधारे लाभ द्यावा.

मोकाट कुत्र्यांचा उपद्रव; तुळजाभवानी मंदिराकडे जाणारा पदपथ धोकादायक

■ पिंपरी (दै. संध्या)





पिंपळे गुरव येथील तुळजाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर आणि पदपथावर सध्या मोकाट कुत्र्यांचा मोठा सुळसुळाट झाला आहे. दिवसभरात विशेषतः सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी या रस्त्यावरून तसेच पदपथावरून नागरिक आणि वाहनांची मोठी रेलचेल असते. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच शाळकरी विद्यार्थी पिंपळे गुरव येथील बस स्टॉपवर जाण्यासाठी याच पदपथाचा प्रामुख्याने वापर करतात. सध्या या पदपथावर फिरणाऱ्या कुत्र्यांच्या टोळ्यांमुळे पादचारी आणि वाहनचालक प्रचंड दहशतीखाली वावरत आहेत.

सध्या तुळजाभवानी मंदिरामध्ये शारदीय नवरात्रोत्सव अत्यंत उत्साहात सुरू आहे. या नऊ दिवसांच्या काळात देवीच्या दर्शनासाठी आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या भाविकांची व नागरिकांची मोठी गर्दी होत असते. मंदिराकडे जाणारे रस्ते आणि पदपथ गजबजलेले असतात. मात्र, अशा पवित्र व गर्दीच्या काळातही मोकाट कुत्र्यांचा उपद्रव कायम असल्याने भाविक, विशेषतः महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी आणि भाविकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य व पशुवैद्यकीय विभागाकडे या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पदपथावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी आणि नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व त्यांना पकडण्याची मोहीम तत्काळ राबवून पदपथ पूर्णपणे भयमुक्त करावे, अशी मागणी होत आहे.

तुळजाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या पदपथावर काही बेजबाबदार नागरिकांकडून उघड्यावर कचरा व शिळे अन्न टाकले जात आहे. खाण्याच्या शोधात असणारी मोकाट कुत्रे येथे मोठ्या संख्येने एकत्र जमा होतात.

त्यामुळे या भागाला जणू कचराकुंडी आणि कुत्र्यांच्या अड्ड्याचे स्वरूप आले असून, परिसरात दहशतीचे वातावरण आहे. सकाळ-संध्याकाळ पिंपळे गुरव बसस्थानकातून कामासाठी जाणाऱ्या नागरिकांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर ही कुत्रे अचानक भुंकत अंगावर धावून जात आहेत.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रवासी थांब्याच्या विरूद्ध दिशेने जाणाऱ्या बसेसमुळे गैरसोय

सासवड : दैनिक संध्या

नेहरू स्टेडियम येथे कोथरूड निगडी, एनडीए, मनपा, भोसरी व मुळशी तालुक्यात जाणाऱ्या बससाठी थांबा आहे. मात्र उड्डाणपुलामुळे या रस्त्याची उत्तर दक्षिण अशी विभागणी झाली आहे. बस थांबा दक्षिण भागात आहे, मात्र सर्व बस स्वारगेटवरून सारसबागेकडे जाताना उत्तर भागात असलेल्या रस्त्यावरून जात असल्याने या थांब्यावर थांबणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर बस येत नाही पाहून प्रवासी सणस मैदानाजवळ असणाऱ्या थांब्यावर जातात. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे, शिवाय त्यांचा वेळही वाया जात आहे. वरील भागात जाणाऱ्या सर्व बस उड्डाणपुलाच्या दक्षिण बाजूकडून जाव्या यासाठी योग्य ती कार्यवाही व्हावी.

तथाकथित विनयभंगाच्या खटल्यातून नारायण घोडे यांची निर्दोष मुक्तता

■ ॲड. बापुसाहेब शिलवंत यांनी प्रभावीपणे बाजू मांडली

बारामती : दैनिक संध्या

तथाकथित विनयभंगाच्या आरोपाखाली दाखल असलेल्या फौजदारी खटल्यातून नारायण हरीभाऊ घोडे यांची बारामती येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली.सदर प्रकरणात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३५४ अन्वये आरोप ठेवण्यात आला होता.या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. बापुसाहेब शिलवंत यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. खटल्याच्या सुनावणीदरम्यान फिर्यादीच्या साक्षीतील विसंगती, घटनेच्या तारखेबाबत स्पष्टता नसणे,पूरक पुराव्यांचा अभाव आणि तपासातील त्रुटी या बाबी बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अभियोग पक्ष आरोपीविरुद्धचा आरोप संशयातीतपणे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपी नारायण हरीभाऊ घोडे यांची निर्दोष मुक्तता केली.या निकालामुळे संबंधित खटल्यात बचाव पक्षाने मांडलेल्या कायदेशीर मुद्द्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

अटकावून ठेवलेल्या वाहनांचा २३ ऑक्टोबर रोजी ई-लिलाव

बारामती : दैनिक संध्या

मोटार वाहन कर न भरल्यामुळे तसेच मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमांतील विविध तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे अटकावून ठेवलेल्या वाहन मालकांनी ७ दिवसांच्या आत ताबा न घेतल्यास २३ ऑक्टोबर २०२६ रोजी ई लिलाव करण्यात येईल, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कळविले आहे. वाहनांच्या मूळ मालकांना वाहन कर, दंड व इतर देय रक्कम भरण्याबाबत यापूर्वी तीन नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. तथापि, संबंधित वाहनमालकांकडून अद्याप देय रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही व वाहनांचा ताबाही घेण्यात आलेला नाही. या ५ वाहनांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित वाहनमालकांनी, ताबेदारांनी कार्यालयीन प्रकरणांची पूर्तता करून, थकीत कर, दंड व इतर देय रक्कम भरून विहित कालावधीत संबंधित वाहनांचा ताबा न घेतल्यास, कोणतीही पुढील सूचना न देता सदर वाहनांचा भंगार (Scrap) स्वरूपात जाहीर ई-लिलाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती यांच्यामार्फत www.mstcecommerce.com च्या संकेतस्थळावर करण्यात येईल याची संबंधित वाहनमालक, ताबेदार यांनी नोंद घ्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

आळंदीत पाणीपुरवठ्यात पाच मिनिटांची कपात; पाण्याचा अपव्यय केल्यास कारवाई

आळंदी : दैनिक संध्या

आगामी काळात पर्जन्यमानात अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन आळंदी नगरपरिषदेने पाणीपुरवठ्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार पाणीपुरवठ्याच्या वेळेत पाच मिनिटांची कपात करण्यात येणार असून, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार उपलब्ध जलसाठ्याचे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच नवीन शासन परिपत्रकानुसार १० टक्के पाणी कपात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपरिषदेमार्फत होणाऱ्या नियमित पाणीपुरवठ्याच्या वेळेत पाच मिनिटे कपात केली जाणार आहे. तसेच ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत नवीन नळजोडणी देण्यात येणार नाही. पाणी वाहने धुण्यासाठी वापरू नये. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून नळजोडणी कायमस्वरूपी बंद करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे. नळाला तोटी बसवणे बंधनकारक असून, पाणी रस्त्यावर किंवा इतरत्र वाहताना आढळल्यास संबंधित नळजोडणी बंद करण्याची कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करून नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महावितरणच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक

इंदापूर : दैनिक संध्या

राज्य शासनाच्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत (कुसुम सौर कृषी पंप योजना) अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना महावितरणच्या नावाखाली फोन करून गंडा घालण्याचे प्रकार समोर येत आहेत. पडताळणीच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून फोनवर ओटीपी घेऊन त्यांच्या नकळत व इच्छेविरुद्ध विशिष्ट सौर कंपन्यांची निवड केल्याचे प्रकार घडत असून, यामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शेतकरी कर्जमाफीच्या संपूर्ण याद्या जाहीर करा

अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ पुरंदर (दै. संध्या)



शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे की नाही, कोणत्या शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली आहे आणि कोणते पात्र शेतकरी अद्याप लाभापासून वंचित आहेत, याची संपूर्ण व अंतिम लाभार्थी यादी तातडीने जाहीर करावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे पुणे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली असतानाही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे कर्जमाफीचा लाभ मिळणार की नाही, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. कर्जबाजारीपणामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या कर्जमाफी योजनेतही पारदर्शक माहिती मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. आपल्या निवेदनात दत्तात्रय कड यांनी तालुकानिहाय व गावनिहाय लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या सार्वजनिक कराव्यात, तसेच कर्जमाफीसाठी पात्र असूनही लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांची स्वतंत्र यादी प्रसिद्ध करावी, अशी मागणी केली आहे.

तसेच कर्जमाफीची रक्कम, लाभार्थी संख्या आणि पात्रतेचे निकष याबाबतची संपूर्ण माहिती जनतेसमोर पारदर्शकपणे मांडावी. पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिला असल्यास त्याच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. "शेतकऱ्यांच्या हक्काच्या कर्जमाफीमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई, अपारदर्शकता किंवा गैरप्रकार आम आदमी पार्टी सहन करणार नाही," असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. कर्जमाफीची संपूर्ण अधिकृत यादी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत सार्वजनिक करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आम आदमी पार्टीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड यांनी प्रशासनाला दिला आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार की नाही, याबाबतचा संभ्रम दूर करून शासनाने तातडीने संपूर्ण आणि अंतिम लाभार्थी यादी जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. यावेळी दत्तात्रय कड,सचिन गायकवाड, राजन पवार,संदीप चौंडकर, संतोष खोमणे, सत्यजित जगताप उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी उपाययोजना करण्याची गरज : शर्मिला राज ठाकरे

■ जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्रामध्ये यंदाच्या दुष्काळाची दाहकता जाणवू लागली आहे.ग्रामीण भागात दौरे करताना पाण्यावाचून जळत असलेली पिके पाहता पुढील काळात पशुधनाचा चारा आणि पिण्याचे पाण्यासाठी उपाययोजना, जळालेल्या पिकांचे नियोजित पद्धतीने पंचनामे होणे गरजेचे आहे मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या धोरणातून दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक तेथे आणि शक्य असेल ती मदत करण्याचा निश्चित प्रयत्न राहीलयाबाबत मुंबईला गेल्यानंतर राज ठाकरे यांच्यापुढे हा विषय मांडला जाईल असे आश्वासन शर्मिला राज ठाकरे यांनी जेजुरी येथे दिले. पुरंदर मनसे तालुकाप्रमुख उमेश जगताप व रवींद्र चिंबळकर यांनी महिलांसाठी नव्याने निर्माण केलेल्या वस्त्रदालनाचे उदघाटन मंगळवारी (दि.१३) शर्मिला ठाकरे यांचे हस्ते करण्यात आले . यावेळी त्या बोलत होत्या यावेळी, मनसे राज्य सरचिटणीस रिटा गुप्ता, जानकी सरदेसाई, मनसे जिल्हाध्यक्ष ॲड. पोपटराव सूर्यवंशी, मकरंद पाटे, सिने निर्माते महेश पटेल, सिने अभिनेते संतोष जुवेकर, जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडेपाटील, आजी माजी नगरसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी, व्यवसायिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेवर प्रखर टीका करताना ठाकरे पुढे म्हणाल्या की, सद्या काम करणारे एक आणि निवडून येणारे वेगळे असे चित्र निर्माण झाले आहे आपण काम करतो आणि ज्ञानेश कुमार यांच्या कृपेने दुसरेच निवडून येतात हा प्रकार आता बंद व्हायला हवा. यावेळी नगराध्यक्ष जयदीप बारभाई, सिनेअभिनेते संतोष जुवेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले प्रास्ताविक उमेश जगताप यांनी तर माजी प्रमुख विश्वस्त संदीप जगताप यांनी स्वागत केले सुत्रसंचलन शिवराज झगडे यांनी केले.

इंदापूर तालुक्यात सुका-ओला चारा वाहतुकीवर बंदी

■ जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

■ इंदापूरसह आठ तालुक्यांतील पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्याचा निर्णय

■ वालचंदनगर (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या आठ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून इतर जिल्ह्यांत किंवा राज्याबाहेर सर्व प्रकारचा सुका व ओला चारा, कडबा, कुट्टी आणि पेंढा यांची वाहतूक व विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध राहावा, यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. पुणे जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा इतर जिल्ह्यांत तसेच सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी पाठवला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर चाऱ्याची टंचाई निर्माण होऊन पशुधनाच्या संगोपनावर परिणाम होऊ शकतो. जनावरांसाठी आवश्यक चारा जिल्ह्यातच उपलब्ध राहावा आणि संभाव्य टंचाई टाळता यावी, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. चाऱ्याच्या टंचाईमुळे पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण होण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाची अधिकृत मंजुरी असलेल्या चारा वाहतुकीला या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

हा आदेश पुढील आदेश जारी होईपर्यंत लागू राहणार असून, त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

तरुणाईने संस्कृती, परंपरा आणि अध्यात्माचा वारसा जपावा

■ परम पूज्य शेखर दामोदर महानुभाव बाबाजी कोरेगावमूळ येथे नवरात्र महोत्सवानिमित्त आध्यात्मिक मार्गदर्शन

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



श्रीकृष्ण मंदिर तथा श्रीकृष्ण आध्यात्मिक प्रतिष्ठान, कोरेगावमूळ येथे आयोजित नवरात्र महोत्सवानिमित्त परम पूज्य शेखर दामोदर महानुभाव बाबाजी यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. आजच्या तरुण पिढीने भारतीय संस्कृती, धार्मिक परंपरा आणि अध्यात्माचा वारसा जपत त्यांचा अभिमान बाळगावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. आधुनिक तंत्रज्ञान आणि स्पर्धेच्या युगात तरुणांनी शिक्षण, व्यवसाय व सामाजिक प्रगती साधताना अध्यात्माची जोड देणे आवश्यक आहे. अध्यात्म हे केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित नसून, ते माणसाला सदाचार, संयम, विवेक आणि मानवतेची शिकवण देणारे जीवनतत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तरुणांनी आपल्या संस्कृतीची मुळे आणि संत-महंतांचे विचार समजून घेणे गरजेचे असल्याचे बाबाजी यांनी सांगितले. लिळाचरित्रातून सदाचाराची प्रेरणा - महानुभाव पंथाचे आद्य आचार्य सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या तत्त्वज्ञानातून सदाचार, भक्तिभाव, नैतिकता आणि योग्य आचरणाची शिकवण मिळते. महानुभाव पंथाचा अमूल्य ठेवा असलेल्या लिळाचरित्राचे वाचन, चिंतन आणि मनन केल्याने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. तरुणांनी पंथाच्या आध्यात्मिक साहित्याचा अभ्यास करून त्यातील विचार दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. भगवद्गीतेचा संदेश आजही दिशादर्शक- भगवद्गीतेमध्ये कर्तव्य, कर्मयोग, आत्मसंयम, निष्ठा आणि समत्वभाव यांचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला आहे. यश-अपयशात मनाचा समतोल राखून प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडणे आणि विवेकाने निर्णय घेणे ही भगवद्गीतेची शिकवण आजच्या तरुणांसाठीही मार्गदर्शक आहे. धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केवळ ज्ञान मिळवण्यासाठी नव्हे, तर त्यातील तत्त्वे प्रत्यक्ष जीवनात उतरवण्यासाठी करावा, असे त्यांनी अधोरेखित केले. संस्कृतीचे जतन ही प्रत्येकाची जबाबदारी -आधुनिकतेचा स्वीकार करताना संस्कृती आणि परंपरांचा विसर पडू देऊ नये. तरुणांनी ज्येष्ठांचा आदर करावा, सामाजिक सलोखा जपावा आणि चांगल्या विचारांची समाजात रुजवण करावी. संस्कृतीचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवून प्रगती आणि परंपरा यांचा समतोल साधणे ही काळाची गरज असल्याचा संदेश परमपूज्य शेखर दामोदर महानुभाव बाबाजी यांनी दिला. श्रीकृष्ण मंदिर तथा श्रीकृष्ण आध्यात्मिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित नवरात्र महोत्सवातून भाविकांना धार्मिक, आध्यात्मिक व वैचारिक मार्गदर्शन मिळत असून, अशा उपक्रमांमुळे तरुणांमध्ये संस्कृतीविषयी अभिमान आणि अध्यात्माविषयी आस्था निर्माण होण्यास मदत होत आहे. यावेळी श्रीकृष्ण मंदिराचे व्यवस्थापक प.पू.अनिल बाबा महानुभाव, श्रीकृष्ण आध्यात्मिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विठ्ठल कोलते, प.पू. स्वप्नील शहापूरकर, बबन कोलते, जयसिंग भोसले, सुनील खेडेकर, शिवाजी भोसले, सुदर्शन कानकाटे, बाबासाहेब चौधरी, संजय भोसले, उमेश सरडे, हरिभाऊ बोधे, संपत भोरडे, तुकाराम ताटे, बापू गिरी, अतुल सावंत, सूरज बोधे, जीवन भोसले, प्रसाद सरडे, दत्तात्रय भोसले, राजेंद्र गायकवाड, कुलदीप सरडे आदी सद्भक्तांसह महिला, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसाद व नामस्मरण, आरती पुजा पाठ पारायण आदी नित्यनेमाने विधी चालू आहे.

विद्यार्थ्यांनी अनुभवला किल्ल्याचा इतिहास



■ नारायणगाव (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव निर्माण व्हावी आणि महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाची प्रत्यक्ष ओळख व्हावी या उद्देशाने, श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी येथील इयत्ता सहावीच्या १५० विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्यास शैक्षणिक भेट दिली.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास, महाराष्ट्राची संस्कृती आणि ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व जवळून समजून घेता आले. किल्ल्यावर पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने शिवनेरी किल्ल्याचा परिसर दुमदुमून टाकला. प्रसिद्ध इतिहास संशोधक सिद्धार्थ कसबेयांनी विद्यार्थ्यांना शिवनेरी किल्ल्याचा इतिहास, किल्ल्यावरील आठ दरवाजांचे महत्त्व,शिवकालीन स्थापत्यकला आणि तत्कालीन संरक्षणव्यवस्थेविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची पाहणी करत विविध प्रश्न विचारून इतिहास समजून घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी किल्ल्यावरील शिवाई देवी मंदिरात दर्शन घेतले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी किल्ला परिसरात स्वच्छता उपक्रम राबवून ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेश दिला.

संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशासकीय अधिकारी शामल चौधरी, प्राचार्या शबनम मोमीन आणि उपप्राचार्या रजनी बाणखेले यांच्या नियोजनातून या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीत शिक्षिका निरुपमा वैद्य, माधुरी पाटील, जयश्री कापसे, प्रथमेश निघोट, मोहित वानखेडे, महादेव गायकवाड आणि अन्वर पठाण यांनी सहभाग घेतला. ऐतिहासिक स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांना इतिहासाचे ज्ञान मिळण्यासोबतच वारसा जतन करण्याची प्रेरणाही मिळाली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्व. मयूरभाऊ पवार जयंतीनिमित्त वह्यांचे वाटप


■ नारायणगाव (दै. संध्या)



सामाजिक बांधिलकी,शैक्षणिक प्रेम व सेवाभाव यांचा सुंदर संगम घडवून आणत स्व.मयूरभाऊ पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा नगदवाडी ता.जुन्नर,जि.पुणे येथे इयत्ता पहिली ते सातवीतील सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.हरिओम ग्रुप आळेफाटा व स्व.मयूरभाऊ पवार मित्रपरिवार यांच्या वतीने हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला.अशी माहिती नगदवाडी केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांच्या शिक्षणप्रवासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. स्व.मयूरभाऊ पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना प्राधान्य देत त्यांच्या स्मृतींना विधायक कार्यातून उजाळा देण्याचा आदर्श या उपक्रमातून घालून देण्यात आला. शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम असून विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. याच भावनेतून हरिओम ग्रुप आळेफाटा व स्व.मयूरभाऊ पवार मित्रपरिवाराने पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांना वह्या मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक साहित्यामध्ये भर पडली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच समाजातील सेवाभावी वृत्तीला बळ मिळते. या कार्यक्रमास नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे,नगदवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,वडगाव आनंद गावचे माजी उपसरपंच गणेश भुजबळ,वडगाव आनंद विविध कार्यकारी सहकारी सोसायटी संचालक निमेश वाळुंज,स्व. मयूरभाऊ पवार यांचे बंधू निशांत पवार,चिरंजीव कुमार ऋग्वेद पवार,वडगाव-कांदळी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमन संजय मुटके यांच्यासह विविध मान्यवर, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



उद्योगांच्या गुंतवणूक परिसंस्था निर्मितीत महाराष्ट्र सर्वात आघाडीवर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात महाराष्ट्रात गुंतवणुक करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.



यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते. पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल', 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डिन' यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.

महाराष्ट्रात औद्योगिक कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता, पाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि साधनसंपत्तीचे पुनर्नवीकरण यासारख्या स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. जागतिक कंपन्यांना त्यांची 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यासाठी राज्य शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची संधी उपलब्ध होईल. येत्या काळात महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध करारांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीतून अधिक दृढ होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स म्हणाले, यूकेच्या ज्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करू इच्छितात, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हे सर्वात नैसर्गिक आणि योग्य ठिकाण आहे. या राज्याची निवड त्याच्या स्पष्ट आर्थिक ताकदीमुळे, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्वामुळे केली आहे. राज्याची अर्थव्यवस्था ही युरोपमधील नॉर्वे देशापेक्षाही मोठी आहे. महाराष्ट्रात केवळ एका कागदावर स्वाक्षरी करण्यासाठी आलेलो नाही, तर आम्हाला प्रत्यक्ष परिणाम आणि यश हवे आहे. दोन्ही बाजूंच्या लोकांनी एकत्र येऊन हे काम पुढे न्यावे आणि दोन्ही देशांच्या प्रगतीला गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी यूकेमधील स्कॉटलंडचे पर्यावरण, अन्न आणि ग्रामीण व्यवहार सचिव डेम अँज्युला ईगल, राज्य सचिव डग्लस अलेक्झांडर, ईयू आणि आंतरराष्ट्रीय व्यापारचे संचालक सोफी ब्राईस, दक्षिण आशियासाठी यूकेचे उप-व्यापार आयुक्त हरशबीर संघा, इंग्लंडचे दक्षिण आशियासाठी व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारतासाठी ब्रिटनचे उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग, महापौर आदी उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



नव्या उमेदीने शेती करण्यास बळ देण्याचा शासनाचा प्रयत्न

धुळे (दैनिक संध्या) : कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, तर कधी शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत डोक्यावरील थकीत कर्जाचे ओझे हलके होणे, ही शेतकरी कुटुंबांसाठी मोठी दिलासादायक बाब आहे. याच दिशेने राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026 अंतर्गत महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या योजनेच्या आज प्रसिद्ध झालेल्या तिसऱ्या यादीत धुळे जिल्ह्यातील 2,919 पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी ही माहिती दिली. पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले की, शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती करताना निसर्गाच्या लहरीपणाबरोबरच आर्थिक संकटांनाही त्याला सामोरे जावे लागते. अशा वेळी थकीत कर्जातून दिलासा मिळाल्यास शेतकऱ्यांना पुढील हंगामाचे नियोजन अधिक आत्मविश्वासाने करता येईल. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करून त्यांच्या शेतीला आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याला बळ देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुक्तीभूमीचा विचार प्रेरणादायी

नाशिक : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ९१ वर्षांपूर्वी येवला येथील मुक्तीभूमीतून केलेल्या धर्मांतराच्या घोषणेचा प्रभाव पुढे नागपूरच्या दीक्षाभूमीवरही जगाने अनुभवला. बाबासाहेबांनी आपल्याला गुलामीतून मुक्त करून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला, या भावनेतून मुक्तीभूमीवर नतमस्तक होण्यासाठी नागरिक येतात. बाबासाहेबांच्या विचारांनी वंचित आणि शोषित समाजाला स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली असून, या ऐतिहासिक भूमीचे महत्त्व नेहमीच अबादीत राहील. असे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या ऐतिहासिक घोषणेच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमित्त येवला येथील मुक्तीभूमीवर आयोजित अभिवादन सोहळ्यास मंत्री श्री. शिरसाट यांनी भेट देऊन बाबासाहेबांना अभिवादन केले. स्तुपाला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला त्यांनी अभिवादन केले. यावेळी आमदार किशोर दराडे, माजी आमदार नरेंद्र दराडे यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आश्रमशाळांमधील १.३२ लाख विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

मुंबई : आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखून त्यांना निरोगी भविष्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत आश्रमशाळांमध्ये 'ॲनिमिया निवारण कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३४९ शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील एकूण १ लाख ३२ हजार ३५४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी दिली. आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधताना शिक्षणासोबतच आरोग्य व पोषणाला प्राधान्य देण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून राज्यातील २५६ शासकीय आश्रमशाळांमधील ८७ हजार ७५१, ८१ अनुदानित आश्रमशाळांमधील ४१ हजार ९३८ आणि १२ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील २ हजार ६६५ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली आहे. राज्यातील विविध विभागांमध्ये टप्प्याटप्प्याने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

वाचन प्रेरणा दिन : पुस्तकांच्या पलीकडे विवेकाचा शोध!

■ मुंबई (दै. संध्या)



माहितीच्या महासागरात ज्ञानाचा दीप आणि मतांच्या कोलाहलात विवेकाचा आवाज बनण्याची क्षमता वाचनात आहे. म्हणून वाचन हा केवळ छंद नाही, तर व्यक्तीच्या बौद्धिक स्वातंत्र्याचा आणि समाजाच्या वैचारिक आरोग्याचा मूलाधार आहे. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा आणि ज्ञानाच्या साधनेशी नव्या पिढीचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या दिवसाचे खरे औचित्य भाषणांमध्ये, पुस्तक प्रदर्शनांमध्ये किंवा एक दिवसाच्या वाचन उपक्रमांमध्ये नसून, त्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या दीर्घकालीन वाचनसंस्कृतीत आहे. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने आपण वाचनाचा उत्सव साजरा करतो आहोत, की वाचणारा समाज घडविण्याच्या दिशेने प्रत्यक्ष पावले टाकतो आहोत याचे चिंतन करणे गरजेचे आहे.

आज माणसाच्या हातात जग आले आहे. पण त्या जगाचा अर्थ समजून घेण्यासाठी आवश्यक असलेली विचारांची खोली त्याच्याकडे आहे का? एका स्पर्शात हजारो माहितीचे तुकडे उपलब्ध होतात. काही सेकंदांत बातम्या, मते, विश्लेषणे, छायाचित्रे आणि चित्रफिती आपल्या डोळ्यांसमोरून सरकतात. माहितीचा वेग अभूतपूर्व आहे. मात्र या वेगाच्या धावपळीत विचार करण्यासाठी आपण थांबतो का? वाचलेल्या मजकुरामागील सत्य तपासतो का? आपल्या मतांपेक्षा वेगळा विचार समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? हे प्रश्न केवळ शिक्षणव्यवस्थेपुढील नाहीत, तर संपूर्ण समाजापुढील आहेत. कारण वाचनाचा संबंध अक्षर ओळखीपुरता मर्यादित नसतो. तो माणसाच्या विचारक्षमतेशी, संवेदनशीलतेशी, निर्णयक्षमतेशी आणि लोकशाहीतील सहभागाशी जोडलेला असतो. म्हणूनच 'वाचन प्रेरणा दिन' हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनात वाचनाचे स्थान पुन्हा तपासण्याचा दिवस आहे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन, साधेपणा आणि स्वप्नशीलता यांचा सुंदर संगम. विज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान, भारताच्या क्षेपणास्त्र आणि अवकाश संशोधन कार्यक्रमांतील त्यांची भूमिका, राष्ट्रपती म्हणून त्यांनी तरुणांशी साधलेला संवाद आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेवरील त्यांचा दृढ विश्वास यांमुळे ते देशाच्या सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाचे प्रेरणास्थान ठरले. मोठी स्वप्ने पाहण्यासाठी कल्पनाशक्ती आवश्यक असते. परंतु त्या स्वप्नांना वास्तवात उतरविण्यासाठी ज्ञान, जिज्ञासा, परिश्रम आणि सातत्यपूर्ण अध्ययन आवश्यक असते याचा कृतीशील वस्तूपाठ त्यांनी समजावून दिला. डॉ.कलाम यांचे स्मरण करताना त्यांच्या ज्ञानकेंद्री जीवनदृष्टीला आपल्या दैनंदिन आचरणात स्थान देणे ही त्यांना वाहिलेली अधिक अर्थपूर्ण आदरांजली ठरेल. त्यांच्या जयंतीचा दिवस प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक, प्रत्येक शिक्षकाच्या अध्यापनात जिज्ञासा आणि प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या वातावरणात मुक्त विचार घेऊन आला, तर वाचन प्रेरणा दिनाचे प्रयोजन खऱ्या अर्थाने साध्य होईल.

साहित्यवाचन माणसाला दुसऱ्याच्या जागी उभे राहून विचार करण्याची संधी देते. एखाद्या कथेतून वंचित व्यक्तीचे जगणे समजते, कवितेतून एखाद्या वेदनेला शब्द मिळतात, तर आत्मचरित्रातून संघर्षाचे अदृश्य पैलू समोर येतात. यामुळे सहानुभूती, संवेदनशीलता आणि मानवी संबंधांविषयीची समज विकसित होण्यास मदत होते. मात्र, वाचनामुळे पुस्तकात मांडलेला दावा कितपत विश्वासार्ह आहे, त्यामागे कोणते पुरावे आहेत, लेखक कोणत्या दृष्टिकोनातून लिहितो आणि त्याच्या युक्तिवादात कोणत्या मर्यादा आहेत, हे तपासणेही तितकेच आवश्यक आहे.

सोनसरी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी व कारवाईचे आदेश

■ गडचिरोली (दै. संध्या)

कुरखेडा तालुक्यातील सोनसरी येथील शासकीय आश्रमशाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या १४ वर्षीय विद्यार्थिनीच्या आत्महत्येच्या घटनेची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे तसेच संबंधित अधीक्षिकेला तात्काळ निलंबित करून तिच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना अनुग्रह अनुदान म्हणून दोन लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर डॉ. वुईके यांनी कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयात भेट देऊन विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधला आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेतली. या प्रकरणात कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यानंतर पत्रकारांशी बोलताना डॉ. वुईके यांनी आश्रमशाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. घटनेच्या अनुषंगाने संबंधितांची जबाबदारी तपासून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. गडचिरोली प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही डॉ. वुईके यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना दिल्या.

मतमोजणी केंद्रातील सुरक्षा सुविधांचा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडून आढावा

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज चिकलठाणा येथील कलाग्रामसमोरील मोकळ्या जागेत उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची पाहणी करून सुरक्षा व्यवस्था व आवश्यक सुविधांचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा, मतपेट्या ठेवण्याची व्यवस्था, मतमोजणी कक्ष, वीजपुरवठा व पर्यायी वीज व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका तसेच उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी उपलब्ध सुविधांची माहिती घेतली. मतमोजणी प्रक्रियेत वीजपुरवठ्यामुळे कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतमोजणीच्या दिवशी अधिकारी, कर्मचारी व उमेदवारांच्या प्रतिनिधींना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रवेश व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि अन्य मूलभूत सुविधांची पूर्तता वेळेत करावी. तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून मतमोजणी केंद्रावरील आवश्यक व्यवस्था सज्ज ठेवावी.

'Bappa.org'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील घराघरांतील गणेश परंपरा, लोककला आणि सांस्कृतिक वारशाचे जतन

■ मुंबई (दै. संध्या)

गणेशोत्सवाचे दहा दिवस संपले तरी बाप्पाशी असलेले भावनिक नाते आणि महाराष्ट्रातील गणेश परंपरेचा समृद्ध वारसा वर्षभर जतन करण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या 'Bappa.org' या डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील घराघरांतील गणेश परंपरा, कथा, आठवणी आणि ६४ कलांची नोंद केली जाणार आहे. नागरिकांना आपल्या कुटुंबातील परंपरा, गणेशोत्सवाच्या आठवणी, लोककला आणि सांस्कृतिक ठेवा या व्यासपीठावर नोंदवून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जगापर्यंत पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २९ सप्टेंबर २०२६ रोजी या व्यासपीठाचा जागतिक शुभारंभ करण्यात आला. शुभारंभानंतर १ ऑक्टोबरपर्यंत या व्यासपीठावर ३२ हजार २३९ नागरिकांनी नोंदणी केली असून १८ हजार २९ कथा नोंदविण्यात आल्या आहेत. या उपक्रमांतर्गत आपल्या घरातील गणेश परंपरा आणि आठवणींची नोंद करणाऱ्या सुमारे १८ हजार नागरिकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सवापुरते मर्यादित न राहता वर्षातील ३६५ दिवस महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांचे दस्तऐवजीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

'बाप्पा फक्त दहा दिवसांचा नाही. वर्षाचे ३६५ दिवस, घरोघरी बाप्पा' हा या मोहिमेचा मुख्य संदेश आहे. प्रत्येक घर, कुटुंब, गणेश मंडळ, मंदिर आणि समाजसमूहाशी जोडलेल्या गणेश परंपरांची नोंद करून हा वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्यावर या उपक्रमाचा भर आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ सप्टेंबर रोजी झालेल्या जागतिक शुभारंभ सोहळ्यात हे व्यासपीठ काळाची गरज असल्याचे नमूद केले होते. राज्यातील सुमारे ४० हजार गावांपर्यंत 'बाप्पा रथ'च्या माध्यमातून या उपक्रमाचा संदेश पोहोचविण्याची संकल्पना त्यांनी मांडली. महाराष्ट्रातील प्रत्येक गणेश मंडळ, प्रत्येक मंदिर तसेच जगभरातील महाराष्ट्र मंडळांनी या व्यासपीठावर नोंदणी करून व्यापक सांस्कृतिक परिसंस्था उभी करावी, असे आवाहनही त्यांनी केले होते.

मुख्यमंत्र्यांच्या या संकल्पनेला अनुसरून महाराष्ट्रातील गणेशोत्सवाशी संबंधित परंपरा, लोककथा, कौटुंबिक आठवणी आणि विविध कलाप्रकार यांची एकत्रित नोंद करण्याचा प्रयत्न 'Bappa.org'च्या माध्यमातून केला जात आहे.



स्थानिक पातळीवर प्रचलित असलेल्या परंपरा आणि कलांना डिजिटल माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा महत्वाचा उद्देश आहे.

या मोहिमेत नागरिकांना सहज सहभागी होता यावे, यासाठी व्हॉट्सॲपच्या माध्यमातूनही कथा नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. नागरिकांनी +९१ ९१३६१ ७२६८१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर 'BAPPA' असा संदेश टाइप करून आपल्या घरातील एखादी परंपरा, आठवण किंवा गणेशोत्सवाशी संबंधित गोष्ट सांगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

'आता गप्पा बाप्पाशी' या संकल्पनेअंतर्गत दर मंगळवारी बाप्पासाठी एक मिनिट देऊन आपल्या घरातील परंपरा नोंदविण्याचा संदेश दिला जाणार आहे. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांकडे असलेल्या आठवणी, घराण्याच्या परंपरा आणि स्थानिक सांस्कृतिक वैशिष्ट्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.


गणपती हा ६४ कलांचा अधिपती मानला जातो. महाराष्ट्रात अनेक पारंपरिक कलाप्रकार आणि हस्तकला पिढ्यानपिढ्या जतन केल्या जात आहेत. चित्रकथी, गंजिफा, पैठणी विणकाम, शाडूच्या गणेशमूर्ती तयार करण्याची कला अशा विविध कलांशी संबंधित कारागिरांच्या कामाची नोंद 'Bappa.org'वर करण्यावर भर देण्यात येणार आहे. या माध्यमातून पारंपरिक कलांचे जतन करणाऱ्या कलाकारांची ओळख, त्यांचे कौशल्य आणि त्यांच्या कलेमागील परंपरा यांची माहिती नोंदविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. पेण येथील गणेशमूर्तीकार किंवा पिंगुळी येथील चित्रकथी कलेच्या परंपरेवर आधारित विशेष लेखांच्या माध्यमातून या कलांचा परिचय करून देण्याचेही नियोजन आहे. केवळ गणेशोत्सवातील सजावट किंवा मूर्तीपुरते मर्यादित न राहता, त्यामागील कलात्मक कौशल्य, सांस्कृतिक इतिहास आणि कलाकारांचे योगदान यांची नोंद व्हावी, हा या उपक्रमाचा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्रातील अनेक कौटुंबिक परंपरा या आई, आजी, बहीण आणि मुली यांच्या माध्यमातून जतन केल्या जातात. सणांच्या आठवणी, ओव्या, नैवेद्याच्या पाककृती, पारंपरिक गाणी आणि घरगुती धार्मिक-सांस्कृतिक प्रथा या वारशाचा महत्त्वाचा भाग आहेत. या परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी महिलांनी आपल्या नावाने या गोष्टी 'Bappa.org'वर नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. महिला बचत गट, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून या मोहिमेत सहभाग वाढविण्याचे नियोजन आहे. विशेषतः तरुण पिढीने आपल्या आजी-आजोबांच्या आठवणी आणि कुटुंबाचा इतिहास डिजिटल माध्यमातून जतन करावा, असा संदेश या मोहिमेतून दिला जाणार आहे. गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक उत्सवाला वर्षभराच्या लोकसहभागाची जोड देण्यासाठी २९ ऑक्टोबर २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीच्या चंद्रोदयाच्या वेळी वांद्रे येथील कार्टर रोडवर 'बाप्पाचा कट्टा' हा उपक्रम सुरू करण्याचे नियोजन आहे. या उपक्रमात हजारो नागरिक सहभागी होऊन सहा फूट उंचीच्या मोदकाला रंगविणार आहेत. या उपक्रमाच्या निमंत्रणासाठी आणि नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी १९ ऑक्टोबरपासून प्रसिद्धी उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



ऊसाला ७५०० रुपये दर द्या

■ अन्यथा साखर रोखणार! शेतकऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा; उपसाबंदी उठविण्याची मागणी

पुणे : दैनिक संध्या

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतीसाठी करण्यात आलेली उपसाबंदी तातडीने उठवावी, परिपक्व ऊसाला पाणी उपलब्ध करून द्यावे आणि ऊसाला प्रतिटन ७५०० रुपये दर द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. १५ जूनपासून लागवड झालेला ऊस ऑक्टोबरमध्ये सुमारे १६ महिन्यांचा झाला आहे. हा ऊस परिपक्व झाल्याने त्याची तातडीने तोड होणे आवश्यक आहे. पाणी न मिळाल्यास ऊसाचे वजन व साखर उतारा घटून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. १९६० मध्ये ऊसाचा दर ५२ रुपये प्रतिटन होता. त्यानंतर १९७० मध्ये १०५, १९८० मध्ये २३५, १९९० मध्ये ५४०, २००० मध्ये १०५० आणि २०१० मध्ये २५०० रुपये दर झाला. ही दरवाढ कायम राहिली असती तर ऊसाला ७५०० रुपये दर मिळाला असता, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.तसेच प्रतिकिलो साखरेची एम एस पी ७० रु कारण्यात यावी. ७५०० रुपये दर देणे शक्य नसेल तर दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट रद्द करावी आणि शेतकऱ्यांना आपल्या पसंतीच्या कारखान्याला ऊस देण्याची मुभा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्या मान्य न झाल्यास साखर कारखान्यांमधून तयार साखर बाहेर पडू देणार नाही, असा इशारा शेतकरी संघटनेचे नेते शिवाजीराव नांदखिले यांच्यासह आप्पा महाराज दिघे, शंकर कांबळे, प्रभाकर ज्ञानान,शंकर रामदास कदम, प्रदीप देशमुख, नुकर कवडे आदीनी दिला आहे.

अनियमिततेप्रकरणी जिल्ह्यात चार वितरकांचे परवाने निलंबित

पुणे : दैनिक संध्या

रब्बी हंगाम २०२६ मध्ये निविष्ठांची गुणवत्ता राखण्यासाठी कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथक व गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी पुणे जिल्ह्यातील खत विक्रेत्यांच्या तपासण्या केल्या. या तपासणीदरम्यान गंभीर अनियमितता आढळलेल्या खत विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली असून, चार विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच दोन विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीदरम्यान विक्री परवान्यातील साठा नोंदवहीनुसार शिल्लक असलेला खतसाठा आणि प्रत्यक्ष उपलब्ध खतसाठा यामध्ये तफावत असणे, विक्री परवान्यात समाविष्ट नसलेल्या कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री करणे, जादा दराने खत विक्री करणे, नोंदणी प्रमाणपत्राचे विहित मुदतीत नूतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, परवाना ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे, खत विक्रीचा मासिक प्रगती अहवाल परवाना अधिकाऱ्यांना सादर न करणे आणि मुदतबाह्य निविष्ठा विक्रीसाठी ठेवणे, अशा त्रुटी आढळून आल्या. या अनियमिततांमुळे संबंधित खत विक्रेत्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना योग्य दर्जाची खते, रास्त दरात आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध व्हावीत, यासाठी कृषी विभागामार्फत तपासणी व गुणवत्ता नियंत्रणाची मोहीम राबविण्यात येत आहे. खत विक्रेत्यांनी विक्री परवान्यातील अटी व नियमांचे काटेकोर पालन करावे. साठा नोंदवही अद्ययावत ठेवावी, दरपत्रक व उपलब्ध साठ्याची माहिती दर्शनी भागात लावावी आणि शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

ताबा सुटून झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू, तर दोन महिला जखमी

उरुळी कांचन : दैनिक संध्या

पुणे-सोलापूर महामार्गावर उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीत चालकाला अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने चारचाकीवरील ताबा सुटून झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर याच कारमधील दोन महिला जखमी झाल्या आहेत. हा अपघात बुधवारी (ता. १४) सकाळी हरणा कॉम्प्लेक्सच्या समोर घडला. कारचालक प्रमोद प्रकाश महंत (वय-३०, रा. जेउर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) असे अपघातात मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे. तर मंगल शरद धारक (वय-४२, रा. शिंदवणे, ता. हवेली) व सुरेखा नंदकुमार कांबळे (वय-४१, रा. शिवकृपा मार्केट शेजारी, उरुळी कांचन) असे अपघातात जखमी झालेल्या दोघींची नावे आहेत. यातील मंगल धारक यांच्या डोक्याला व डोळ्याला दुखापत झाली असून, त्यांच्यावर सिद्धिविनायक रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याबाबत सुरेखा कांबळे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुरेखा कांबळे आणि त्यांच्या मैत्रीण मंगल धारक या दोघी भांडगाव (ता. दौंड) येथे खाजगी कंपनीत नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी तळवाडी चौक, उरुळी कांचन येथे आल्या व इर्टिगा कारमध्ये (एमएच १२ वायबी ३७८९) बसल्या, गाडी पुढे निघाल्यानंतर अचानक चालकाने आपले डोके स्टिअरिंगवर टेकवले.

शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करण्यासाठी प्रयत्न : माजी आमदार संजय जगताप

■ जेजुरी (दै. संध्या)

शिवरत्न जिवाजी महाले,शिवाजी काशिद यांचा पराक्रम हा शौर्याचे प्रतीक आहे.या शूरवीर आदर्शांचा महाराष्ट्राला सार्थ अभिमान आहे.शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी व्हावी यासाठी आपण शासन दरबारी पत्रव्यवहार पाठपुरावा करीत आहोत असे पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले. पुरंदर तालुका नाभिक संघटना व सासवड शहर नाभिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवरत्न जिवाजी महाले यांची ३९१ वी जयंती उत्सव व सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.



पुरंदर तालुका नाभिक संघटना आयोजित कार्यक्रमात महापौर अश्विनी निकम यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने सासवड शहरातील मुख्य बाजारपेठेतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये बँड, ढोल-ताशांचे पथक, छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवरत्न जिवाजी महाले यांच्या वेशभूषेत घोड्यावर बसलेले युवक तसेच शिवराय व जीवा महाले यांच्या प्रतिमा विशेष आकर्षण ठरल्या. मिरवणुकीनंतर आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात उल्हासनगरच्या महापौर अश्विनी निकम यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी आमदार संजय जगताप, अशोक टेकवडे, हरिभाऊ लोळे, पंडित मोडक यांच्या उपस्थितीत सामाजिक पुरस्कार वितरण पार पडले. युवा व्याख्याते श्रेयस पाटील यांनी जिवाजी महाले यांच्या जीवनावर व्याख्यान दिले.यावेळी नाभिक समाजांचे जिल्ह्याचे नेते,भगवान बिडवे, चंद्रशेखर जगताप,अंकुश खडके,भगवान शिंदे,बेबीताई कर्हेकर ,शिवाजी राऊत,आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात समाजभूषण पुरस्काराने अश्विनी निकम, सायली शिंदे, अशोक गायकवाड, कैलास बंड, कांता पवार, प्रशांत जाधव, प्रज्ञा राऊत, सुनील पांडे, मंगल मगर, वैशाली पवार, किरण काशीद, देवा साळुंके, संतोष इभाड, अशोक गायकवाड, यांचा तर जीवनगौरव पुरस्काराने शांताराम घोडके, विजया क्षिरसागर, उल्हास क्षिरसागर यांचा आणि ऋतुजा क्षिरसागर व आदिनाथ गायकवाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याचे आयोजन पुरंदर तालुका नाभिक संघटना व सासवड शहर नाभिक संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. समन्वय समितीचे बाळासाहेब साळुंके, मुन्ना शिंदे, डॉ. मनोज शिंदे व तालुका अध्यक्ष सुशील गायकवाड, यांनी विशेष पुढाकार घेऊन परिश्रम घेतले. या सोहळ्यास समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश राऊत यांनी केले.

केंद्राच्या कृषी योजनांतर्गत शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ

■ पुणे (दै. संध्या)

केंद्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना विविध कृषी घटकांसाठी अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना-सूक्ष्म सिंचन, राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान आणि मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना या योजनांचा यामध्ये समावेश आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना-सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचासाठी अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थ्यांना ८० टक्के, तर बहुभूधारक लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान देण्यात येते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ९० टक्के अनुदानाची तरतूद आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत डाळिंब फळबागांसाठी गारपीटरोधक जाळी, द्राक्षांसाठी प्लास्टिक आच्छादन, शेततळे अस्तरीकरण, कांदा चाळ तसेच भाजीपाला रोपवाटिका यांसारख्या घटकांसाठी अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ४० टक्के, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात येते. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत हरितगृह, शेडनेटगृह, प्लास्टिक मल्चिंग, तुषार सिंचन उपकरणे, शेततळे अस्तरीकरण, सामूहिक शेततळे, यांत्रिकीकरण, कांदा चाळ तसेच काढणीपश्चात व्यवस्थापन अशा विविध घटकांसाठी अनुदान उपलब्ध आहे. या योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ४० टक्के, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात येते.

देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ह्युंडाई मोटर इंडिया'च्या प्लांटचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आज महाराष्ट्रातील तळेगाव, पुणे येथील आपल्या अत्याधुनिक उत्पादन प्लांटच्या औपचारिक उद्घाटनाची घोषणा केली, जो भारतातील कंपनीच्या वाढीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या प्लांटचे उद्घाटन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी भारतासाठी कोरिया प्रजासत्ताकाचे राजदूत महामहीम ली सेओंग-हो; महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार; ह्युंडाई मोटर ग्रुपचे (एचएमजी) एक्झिक्युटिव्ह चेअर श्री. युसन चंग, एचएमजीचे व्हाईस चेअर श्री. जेहून चांग, ह्युंडाई मोटर कंपनीचे (एचएमसी) प्रेसिडंट व सीईओ श्री. होजे मुनोज आणि एचएमआयएलचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ श्री. तरुण गर्ग उपस्थित होते. या विशेष प्रसंगी, एचएमआयएलने 1999 पासून भारतातून 4 दशलक्ष प्रवासी वाहनांच्या एकत्रित निर्यातीची ऐतिहासिक कामगिरी देखील साजरी केली, याद्वारे भारताला जागतिक ऑटोमोटिव्ह उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यातील कंपनीचे योगदान अधोरेखित केले. एकत्रितपणे, एचएमआयएल प्रवासी वाहनांची सर्वात मोठी निर्यातदार आणि भारतातून 4 दशलक्ष निर्यातीचा टप्पा गाठणारी पहिली ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी ठरली आहे. कंपनीने देशांतर्गत बाजारपेठेत जवळपास 10 दशलक्ष प्रवासी वाहनांची विक्री केली आहे, ज्यामधून भारतीय ग्राहकांमधील कंपनीची प्रबळ आणि निरंतर उपस्थिती दिसून येते. भारतामधील उत्पादन क्षेत्रातील वाढीसाठी एचएमआयएलच्या बहुमूल्य योगदानाचे कौतुक करत महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "ह्युंडाई मोटर इंडिया'च्या पुणे प्लांटचे उद्घाटन आणि कंपनीने साध्य केलेली 4 दशलक्ष प्रवासी वाहनांची एकत्रित निर्यातीची कामगिरी जागतिक ऑटोमोटिव्ह उत्पादन केंद्र म्हणून भारताची वाढती ताकद दर्शवते. प्रगत उत्पादन तंत्रज्ञान, नाविन्यता, स्थानिकीकरण आणि कौशल्य विकासातील ह्युंडाईची सातत्यपूर्ण गुंतवणूक महाराष्ट्रातील आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती आणि प्रबळ ऑटोमोटिव्ह परिसंस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देईल.

नवरात्रोत्सवात दृष्टिहीन महिला उद्योजिकांचे औक्षण

■ विक्री साहित्य देत स्वावलंबनाला प्रोत्साहन

■ 'मदत नको, संधी द्या' या विचारातून जय गणेश व्यासपीठ व गणेश मंडळांचा स्तुत्य उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्रोत्सवात स्त्रीशक्तीचा जागर होत असताना, केवळ मदतीचा हात देण्यापेक्षा स्वावलंबनासाठी संधी उपलब्ध करून देण्याचा प्रेरणादायी उपक्रम जय गणेश व्यासपीठ, पुणे शहर यांच्या माध्यमातून राबविण्यात आला.

पुणे रेल्वे स्थानकासह विविध ठिकाणी चिक्की, अगरबत्ती, धूप-वाती, खेळणी आणि कटलरी यांसारख्या वस्तूंची विक्री करून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या नऊ दृष्टिहीन महिला उद्योजिकांना विक्रीसाठी आवश्यक साहित्य देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सहकार्याचे तोरण बांधत, त्यांच्या कष्टांचा आणि जिद्दीचा गौरव करणारा हा उपक्रम नवरात्रोत्सवातील स्त्रीशक्तीच्या पूजनाचा एक अनोखा आविष्कार ठरला. बुधवार पेठेतील साईनाथ मंडळ ट्रस्ट, अरण्येश्वर येथील एकता मित्र मंडळ आणि भवानी पेठेतील श्री शिवाजी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी सर्व महिला उद्योजिकांना औक्षण करून त्यांचे अनोख्या पद्धतीने पूजन करण्यात आले आणि त्यांच्या व्यवसायाला हातभार लावण्यासाठी विक्री साहित्य वितरित करण्यात आले. सणांचे खरे मांगल्य केवळ पूजेत नसते, तर समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी देण्यात असते. मदतीपेक्षा स्वावलंबनाला बळ देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आणि माणुसकीचा जागर घडवणारा आहे असे मनोगत खटावकर यांनी केले.



घटस्थापनेच्या दिवशी स्पिनीने केल्या १,३७० कारच्या डिलिव्हरी

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी, म्हणजेच घटस्थापनेला, स्पिनी या वापरलेल्या कारच्या ऑनलाइन व्यासपीठाने देशातील २४ शहरांमध्ये १,३७० कारची डिलिव्हरी करून एका दिवसातील सर्वाधिक डिलिव्हरीचा विक्रम नोंदवला. मागील विक्रमाच्या तुलनेत डिलिव्हरीमध्ये १.७ पट वाढ झाली असून, गेल्या वर्षीच्या नवरात्रीच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत यंदा ९६ टक्के वाढ झाली.११ ऑक्टोबर रोजी दर ४१ सेकंदांनी एका कारचे ग्राहकांना हस्तांतरण करण्यात आले. दुपारी १२ ते १ या वेळेत सर्वाधिक ११२ कार वितरित करण्यात आल्या. शहरनिहाय आकडेवारीत पुणे १८० कारच्या डिलिव्हरीसह आघाडीवर राहिले. दिल्ली-एनसीआर, महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा एकूण डिलिव्हरीमध्ये ६२ टक्के वाटा होता. मारुती सुझुकी बलेनो सर्वाधिक वितरित झालेली कार ठरली. त्यानंतर ग्रँड i10, क्विड, स्विफ्ट आणि टियागोला पसंती मिळाली. एकूण कारपैकी ५५ टक्के हॅचबॅक, २६ टक्के एसयूव्ही आणि १४ टक्के सेडान होत्या. सुमारे ३३ टक्के कार ऑटोमॅटिक ट्रान्समिशनच्या होत्या. ८२ टक्के कार पेट्रोल, तर १२ टक्के डिझेलच्या होत्या.



■ दर ४१ सेकंदांनी एका कारचे हस्तांतरण

द हॅबिटॅट्स ट्रस्टने पुण्यामध्ये संवर्धन कथा आणि प्रत्यक्ष कृतीवर आधारित उपाययोजना आणल्या

■ पुणे (दै. संध्या)

द हॅबिटॅट्स ट्रस्टने (टीएचटी) मंगळवारी ई-स्क्वेअर मल्टिप्लेक्स येथे 'अनदर वे: फ्रॉम स्टोरीज टू सोल्युशन्स' शीर्षकाखाली एक लघुपट प्रदर्शनाचे आणि परिसंवादाचे आयोजन केले होते. यामध्ये संशोधन, विचारपूर्वक नियोजन आणि प्रत्यक्ष उपाययोजना भारताच्या वेगवान आर्थिक विकासासोबत वन्यजीव संवर्धनाचा मेळ कसा घालू शकतात, याचा शोध घेण्यासाठी १४० हून अधिक लघुपट निर्माते, पर्यावरण संशोधक आणि नागरिक एकत्र आले होते.



भारत समृद्ध भविष्याच्या उभारणीकडे पाहत असताना निसर्ग विकासाभोवती काही अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर उपाय देऊ शकतो. आर्थिक वाढ, मानवी कल्याण आणि निसर्ग या सर्वांची एकत्र भरभराट होण्याचे मार्ग शोधून आपण प्रगतीकडे कशा प्रकारे पाहतो, या दृष्टिकोनाला नवा आकार देण्यासाठी द हॅबिटॅट्स ट्रस्ट कार्यरत आहे. हाच दृष्टिकोन सादर करत या कार्यक्रमात लघुपटांच्या माध्यमातून वैयक्तिक प्रजाती आणि चिंतांच्या पलीकडे जाऊन पर्यावरणीय आरोग्य, विकासाच्या निवडी आणि मानवी कल्याण यांच्यातील संबंधांवर चर्चा घडवून आणता येईल, याचा शोध घेण्यात आला.

या चार लघुपटांनी देशभरातील वेगवेगळ्या कथांद्वारे हे संबंध केंद्रस्थानी आणले. आकांक्षा सूद सिंग दिग्दर्शित 'ऑन द ब्रिंक'च्या तिसऱ्या सीझनमधील 'पानी सुअर' लघुपट अंदमान आणि निकोबार बेटांवरील दुर्मीळ डुगॉन्गचा (समुद्री गाय) मागोवा घेतो. मानवी हस्तक्षेप आणि हवामान बदलाच्या प्रभावामुळे धोक्यात आलेल्या प्रजातीचे रक्षण करण्यासाठी विश्वास आणि समुदायाच्या सहभागाची भूमिका अधोरेखित करत हा लघुपट डॉ. स्वप्नाली गोळे आणि स्थानिक समुदायांनी सिटिझन-सायन्स मॉनिटरिंग नेटवर्क विकसित करण्यासाठी केलेल्या कामाला सादर करतो.

ऑन द ब्रिंक'मधील फ्लेमिंगो' लघुपट वेगाने शहरीकरण होत असलेल्या दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्राकडे वळतो, जिथे ग्रेटर फ्लेमिंगो केवळ एक स्थलांतरित पाहुणा नसून वर्षभर वास्तव्यास असणारा निवासी आहे. संशोधक अमित कुमार यांच्या कार्याच्या माध्यमातून हा लघुपट शहरी परिसरामध्ये वन्यजीवांचे स्थान आणि शहरीकरण, अधिवासावरील अतिक्रमण व हवामान बदलाचे परिणाम यांविषयी प्रश्न उपस्थित करतो.

शेअर्ड स्पेसेस'सिरीजमधील आणि एम्मी-नामांकित वन्यजीव लघुपट निर्माते विजय बेदी दिग्दर्शित व बहार दत्त यांनी सूत्रसंचालन केलेला ब्रिजिंग द गॅप' लघुपट भारतातील पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना वन्यजीवांना भेडसावणाऱ्या आव्हानांचे परीक्षण करतो. हा लघुपट हत्तींसाठी अंडरपासेस (भूयारी मार्ग) आणि माळढोक पक्षांसाठी सुरक्षित असणाऱ्या वीजवाहिन्या यांसारख्या दृष्टिकोनातून, पायाभूत सुविधा आणि वन्यजीव एकत्र सहअस्तित्वात राहू शकतात याचा शोध घेतो, तसेच विकासविषयक निर्णयांमध्ये पर्यावरणीय कनेक्टिव्हिटीचा विचार करण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकतो.

सारा दिग्दर्शित 'सिकिंग सार्डिन्स' लघुपट सागरी परिसंस्था, किनारपट्टीवरील मत्स्यव्यवसाय आणि अन्न साखळीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या एका लहान माशाची कथा मांडतो. एकेकाळी परवडणाऱ्या पोषणाचा भरवशाचा स्रोत आणि मच्छिमारांच्या उपजीविकेचा मुख्य आधार असलेला इंडियन ऑइल सार्डिन मासा वाढत्या अनिश्चिततेला तोंड देत आहे, जिथे समुद्राचे वाढते तापमान, बदलणारा मान्सून, हवामान चक्रे, मासेमारीची वाढलेली कार्यक्षमता आणि औद्योगिक मागणी यांमुळे त्याच्या साठ्यावर प्रचंड ताण पडत आहे.

एकत्रितपणे विचार केल्यास, हे लघुपट केवळ वैयक्तिक प्रजाती आणि जैवविविधतेपुरते मर्यादित न राहता त्यांच्या अस्तित्वाला आकार देणाऱ्या व्यापक व्यवस्थांकडे वळतात. तसेच पर्यावरणीय बदलांना शहरे, पायाभूत सुविधा, अन्न सुरक्षा आणि उपजीविकेवर प्रभाव टाकणाऱ्या निवडींशी जोडतात. ते संवर्धनाकडे पाहण्याचा अधिक व्यापक दृष्टिकोन सादर करतात: संवर्धन म्हणजे केवळ काही स्वतंत्र उपाययोजना नव्हे, पण भूप्रदेशांचे व्यवस्थापन कसे केले जाते आणि विकास कसा साधला जातो यामधील अविभाज्य घटक आहे.

लघुपट प्रदर्शनानंतर 'अनदर वे: फ्रॉम स्टोरीज टू सोल्युशन्स' या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये द हॅबिटॅट्स ट्रस्टचे डायरेक्टर ऋषिकेश चव्हाण, द गाया पीपलच्या फाउंडर आकांक्षा सूद सिंग, बेदी युनिव्हर्सलचे वन्यजीव लघुपट निर्माते विजय बेदी; द हॅबिटॅट्स ट्रस्टचे मरीन लीड अभिषेक जमालाबाद आणि रोडकिल्स इंडियाचे को-फाउंडर मिलिंद परिवकम यांचा सहभाग होता.

या चर्चेमध्ये लघुपट सोल्युशन देणाऱ्यांना आणि व्यावहारिक दृष्टिकोनांना अधिक ठळकपणे समोर आणू शकतात, तसेच पायाभूत सुविधा, शहरी विकास आणि नैसर्गिक संसाधनांविषयीच्या व्यापक संवादांशी प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभवांची सांगड घालण्याच्या संधी निर्माण करू शकतात, याचा शोध घेण्यात आला. वास्तविक जगातील आव्हानांवर आधारित असलेल्या कथा प्रेक्षकांना केवळ समस्यांपलीकडे जाऊन त्या सोडवण्याच्या शक्यतांकडे पाहण्यास मदत करू शकतात, यावरही यात विचार करण्यात आला.

"भारताचा विकास नैसर्गिक भांडवलाच्या माध्यमातून साध्य केला जाऊ शकतो. खरी संधी या नैसर्गिक भांडवलाचा वापर करून विकासाचे मार्ग शोधण्यात आहे. द हॅबिटॅट्स ट्रस्टमध्ये आमचा विश्वास आहे की, नेहमीच एक दुसरा मार्ग असतो. विज्ञान, व्यवस्थात्मक विचार आणि विविध भागधारकांना एकत्र आणून आपण विकासाला पुढे नेणारे सोल्युशन्स शोधू शकतो,"असे द हॅबिटॅट्स ट्रस्टचे डायरेक्टर ऋषिकेश चव्हाण म्हणाले.

अनदर वे'च्या माध्यमातून, द हॅबिटॅट्स ट्रस्ट विज्ञान, कथाकथन आणि व्यवस्थात्मक विचार यांना विकासाशी संबंधित संवादांमध्ये आणण्याचा प्रयत्न करत आहे, ज्याद्वारे अधिवास, व्यक्ती आणि अर्थव्यवस्था या सर्वांची एकत्र भरभराट होऊ शकते हे दाखवून दिले जात आहे.